मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

RNI Regd. No. 72105/99 ❊ वर्ष २५ ❊ अंक २०४ ❊ सातारा ❊ मंगळवार, दि. २ एप्रिल २०२४ ❊ पाने ६ (सुप्रभात) ❊ किंमत ५/- रूपये

इम्रान खान यांच्या १४ वर्षाच्या शिक्षेला उच्च न्यायालयात स्थगिती

इस्लामाबाद : पाकिस्तानमधील उच्च न्यायालयाने आज (१ एप्रिल) माजी पंतप्रधान इम्रान खान यांना त्यांच्या तोशाखाना भ्रष्टाचार प्रकरणातील शिक्षेचे अपील मंजूर झाल्याने १४ वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा स्थगिती मिळाली आहे. इम्रान खान यांना शिक्षेच्या स्थगितीमळे मोठा दिलासा मिळाला आहे.

८ फेब्रुवारीच्या निवडणुकीच्या फक्त एक आठवडा अगोदर इम्रान खान आणि त्यांची पत्नी बुशरा बीबी यांना बेकायदेशीरपणे सरकारी (पान २ वर)

शरद पवार यांनी आदेश दिल्यास साताऱ्यातून लढणार – पृथ्वीराज चव्हाण

राजदंड / सातारा

शरद पवार यांनी आदेश दिल्यास मी साताऱ्यातून लढायला तयार आहे. याबाबतचा अंतिम निर्णय पवार यांनाच घ्यायचा आहे, अशी भूमिका राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेसचे नेते आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी साताऱ्यात मांडली आहे.

सातारा लोकसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदारसंघात सर्वांत सक्षम उमेदवार कोण, हे शोधण्याचं काम सुरू आहे. तो उमेदवार सर्वमान्य असेल. माझं नाव काही लोकांनी आणि माध्यमांनी चर्चेत आणलं आहे. सातारा मतदारसंघात उमेदवार कोण असावा याबद्दल चर्चा सुरू आहे, मात्र हा मतदारसंघ राष्ट्रवादीचाच आहे, माझी जयंत पाटील यांच्याबरोबर चर्चा झाली. उमेदवाराचा निर्णय शरद पवार यांनी घ्यायचा आहे. शरद पवार जो उमेदवार देणार त्यामागे आम्ही पूर्ण ताकदीने मागे उभे राहू असं सांगितलं आहे. हा मतदासंघ हा तुतारीचा विषय आहे. तुतारीचा निर्णय त्यांनी घ्यायचा. सातारा लोकसभा काँग्रेसने लढवावी म्हणून प्रस्ताव अजून आला नाही, जर आला तर विचार करू. राष्ट्रवादीकडून शशिकांत शिंदे यांचा निर्णय राष्ट्रवादीने घ्यायचा आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडे सक्षम उमेदवाराचा अभाव जाणवतो आहे, त्यामुळे जर तुम्हाला उमेदवारी दिली तर तुम्ही लढणार काय, असे विचारले असता उमेदवारीच्या जर तर च्या प्रश्नावर मी बोलणार नाही, असे सांगितले.

साताऱ्यातून पृथ्वीराज चव्हाण यांना उमेदवारी मिळणार असल्याच्या चर्चा सुरु असून पृथ्वीराज चव्हाण यांनी यावर खुलासा दिला आहे. हा मतदासंघ राष्ट्रवादीकडे गेला आहे. ४८ पैकी जवळ जवळ सर्व जागांवर एकमत झालं त्याप्रमाणे सातारा मतदारसंघ राष्ट्रवादीकडे आला आहे. भाजपाने जो ४०० चा नारा दिला आहे. आणि आम्हाला ३७० जागा तरी नक्की मिळतील असे भाजपा सांगत आहे. यावर पृथ्वीराज चव्हाण म्हणाले यावेळी असे काही होणार नाही. २०१९ ला बालाकोट बॉम्बस्फोट झाला होता. त्याचा फायदा उचलत त्यांची सहा टक्के मते वाढली होती. त्यामुळे त्यावेळी जागा वाढल्या होत्या. यावेळी राम मंदिराचा भावनिक विषय होऊन त्याचा आपल्याला फायदा होईल असा भाजपचा व्होरा होता. पण असे होताना दिसत नाही. राम मंदिर हा विषय खाजगी आहे तो दोन ट्रस्टचा एकमेकातील विषय होता. त्या ठिकाणी राम मंदिर ट्रस्टने लोकांची मदत घेऊन बांधले. या मंदिराच्या उद्घाटनाला पंतप्रधान मोदींना बोलावले याचा अर्थ त्यांनी मंदिर बांधले असा होत नाही. त्यामुळे राम मंदिराचा फायदा भाजपाला होताना दिसत नाही. निवडणुकीच्या प्रचारात वेगळेच मुद्दे पुढे येताना दिसत आहेत. त्यांना बाबासाहेब आंबेडकरांची घटना बदलायची आहे आणि मनुस्मृती आणायची आहे. त्यामुळे लोकसभेत ३७० जागा त्यांच्याकडे असणे गरजेचे आहे. परंतु असे काही होणार नाही आणि घटना बदलणे ही एवढी सोपी गोष्ट नाही, असे चव्हाण म्हणाले.

अवैध दारू विक्री करणारी टोळी जिल्ह्यातून तडीपार

गंभीर गुन्हे दाखल; जावली तालुक्यातील चार जणांचा समावेश

राजदंड / सातारा

जावलीतील अवैधरित्या दारू विक्री करणारी चार जणांच्या टोळीस पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत.

जिल्ह्यामधील जावली तालुक्यातील मेढा पोलीस ठाणे हद्दीमध्ये सातत्याने गुन्हे करणारे टोळी प्रमुख प्रेम ऊर्फ बबलु विलास पार्ट (वय २४), गणेश विष्णु शिंदे (वय २३), सनी विलास कासुर्ड (वय २२), राहुल रामा कुराडे (वय २५, सर्व रा. मेढा, ता. जावली, जि. सातारा) असून यांच्यावर गर्दी, मारामारी करुन खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत पोहचवणे, अवैध दारुची चोरटी विक्री करणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. मेढा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संतोष तासगावकर यांनी या टोळीला पूर्ण सातारा जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचा प्रस्ताव हद्दपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक सातारा यांच्याकडे सादर केला होता. प्रस्तावाची चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी बी. वाय. भालचिम यांनी केली होती. या टोळीतील इसमांवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करुनही गुन्हे करण्याच्या प्रवृत्तीत कोणताही सुधारणा झाली नाही. ते मेढा परिसरात सातत्याने गुन्हे करीत होते. मेढा व परिसरातील लोकांना या टोळीचा उपद्रव होत होता. अशा टोळीवर सर्वसामन्य जनतेतून कडक कारवाई करण्याची मागणी होत होती. यावर समीर शेख, हद्दपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक सातारा यांच्यासमोर सुनावणी होवून त्यांनी पूर्ण सातारा जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपारीचा आदेश पारीत केला आहे.

हद्दपार प्राधिकरणापुढे सरकार पक्षाच्या वतीने अपर पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर, पोलीस उपनिरीक्षक तानाजी माने, पोलीस हवालदार प्रमोद सावंत, अमित संपकाळ, पोलीस कॉन्स्टेबल केतन शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल अनुराया सणस, मेढा पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक महेश शिंदे यांनी योग्य पुरावे सादर केले होते.

कडक कारवाई करणार

नोव्हेंबर २०२२ पासून ९६ इसमांविरुध्द तडीपार सारखी कारवाई करण्यात आली असून भविष्यातही सातारा जिल्ह्यातील सराईत गुन्हेगारांविरुध्द हद्दपारी, मोक्का, एमपीडीए अशा प्रकारच्या कडक कारवाया करण्यात येणार आहेत.

एक-दोन गुंठे जमीन खरेदी-विक्री शक्य

राज्य सरकारकडून तुकडेबंदी कायद्यात सुधारणा

राजदंड / पुणे

तुकडेबंदी कायद्यात सुधारणा करण्यात आली असून आता एक-दोन गुंठे जमिनीची खरेदी-विक्री करणे शक्य होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

राज्य शासनाने ५ मे २०२२ रोजी राजपत्र प्रसिद्ध केले होते. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांतील जिरायत जमिनीसाठी २० गुंठे, बागायती जमिनीसाठी दहा गुंठे प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले. म्हणजेच, या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी जमीन खरेदी-विक्री होणार नाही. मात्र काही शेतकर्यांना रस्ते, विहीर आदी कारणांसाठी एक-दोन गुंठ्यांतील जमीन खरेदी-विक्री करावी लागते. त्यामुळे शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन राज्य शासनाने तुकडेबंदी कायद्यात सुधारणा केली आहे.

तुकडेबंदी कायद्यात अखेर राज्य सरकारने शिथिलता आणली असून विहीर, शेतरस्ता, सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असलेल्या शिल्लक जमिनीसाठी आणि केंद्र किंवा राज्य (पान २ वर)

आरोग्य विभागात करोडोंचा रुग्णवाहिका घोटाळा? - रोहित पवार

आरोग्य मंत्री तानाजी सावंतांनी राजीनामा द्यावा!

राजदंड / पुणे

आमदार रोहित पवार यांनी राज्याचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्यावर भ्रष्टाचाराचा गंभीर आरोप केला आहे. तसंच, मी केलेल्या आरोपांमध्ये जर तथ्य नसेल तर सावंतांनी सांगावं त्या ठिकाणी त्यांच्यासोबत मी समोरासमोर बोलायला तयार असल्याचं आव्हानही त्यांनी दिलं आहे. ते आज पुण्यात पत्रकारांशी बोलत होते. रोहित पवारांनी यावेळी आरोग्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही जोरदार टीका केली.

आरोग्यमंत्र्यांनी राज्याला भिकारी केलं : निवडणुकीला फंड देण्यासाठी बीव्हीजी आणि सुमित कंपनीवर मोठी मेहरबानी दाखवली जात आहे. तसंच, आरोग्य विभागामध्ये रुग्णवाहिका खरेदीमध्ये सुमारे ६ हजार कोटींचा घोटाळा झाला आहे असा गंभीर आरोपच रोहित पवार यांनी केला आहे. त्याबरोबरच नियम आणि टेंडर डिझाईन करून कसं वळवलं गेलं याबाबतचे सर्व पुरावे आमच्याकडे आहेत असंही ते म्हणाले आहेत. हा लढा सामान्य व्यक्तीचा आहे. (ीलरा ळप हशरश्रींह वशरिींशपीं) आरोग्य विभागातील मोठ्या लोकांनी हा घोटाळा केला असून, या पैशांचा वापर निवडणुकीसाठी करण्याचा प्रयत्न आहे. (हशरश्रींह ाळपळींशी ढरपरक्षळ ड्डुरपीं) आरोग्यमंत्री सावंतांनी हा घोटाळा केला

असून त्यांनी राज्याला भिकारी केलं आहे. सरकारने त्यांची सखोल चौकशी करावी आणि सावंत यांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी थेट मागणीच रोहित पवारांनी केली आहे.

नियमबाह्य पद्धतीने त्यांना रुग्णवाहिका सेवा पुरवण्याचं कंत्राट : रुग्णवाहिका खरेदी घोटाळा कसा झाला याची यावेळी विस्तृत माहिती दिली आहे. ते म्हणाले, स्वच्छता कामं टेंडरमध्ये अचानक मोठ्या प्रमाणात वाढवले गेले. राज्यात अत्यावश्यक सेवेसाठी स्पॅनिश कंपनी यांना टेंडर दिलं गेलं होतं. त्यांच्यासोबत करार करण्यात आला होता. टेंडर हे सुमित कंपनी यांनी डिझाईन केला आणि त्यांनाच मिळालं. त्यांना स्वच्छतेच्या कामाचा अनुभव नसतानाही नियमबाह्य पद्धतीने त्यांना रुग्णवाहिका सेवा पुरवण्याचं कंत्राट दिलं गेलं. तेव्हा, त्यांच्याविरुद्ध तक्रार करणाऱ्या बीव्हीजी कंपनीलाही नाराज न करता त्यांना देखील टेंडरमध्ये सामावून घेण्यात आलं आहे असंही पवार म्हणाले आहेत.

'मी पाच दिवसांचा वेळ देतो' : पिंपरी चिंचवडमधील अमित साळुंखे नावाच्या व्यक्तीची सुमित ही कंपनी आहे. या प्रकरणात साडेसहा हजार कोटी रुपयांचा घोटाळा करण्यात आला. हाच पैसा निवडणूक निधी म्हणून देण्यात आला आहे. सावंत यांना मी पाच दिवसांचा वेळ देतो. त्यांनी आपली बाजू मांडावी. आरोग्य विभाग हा खेकडा पोखरत असून येथे पारदर्शक प्रक्रिया राबवावी असा टोलाही रोहित पवारांनी लगावला आहे. दरम्यान, तानाजी सावंत यांनी खेकड्याने पोखरल्याने धरणांना गळती लागते असं विधान केले होते, या विधानावरून रोहित पवारांनी तानाजी सावंत यांना खोचक टोला लगावत डिवचले आहे.

दुष्काळग्रस्त भागातील दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना शुल्कमाफी

राजदंड / पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कमाफी, शुल्क प्रतिपूर्ती देण्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार दुष्काळग्रस्त भागातील बारावीचे २ लाख ८४ हजार २०८ विद्यार्थ्यांना, तर दहावीचे ३ लाख २८ हजार ९१४ विद्यार्थी असून, दहावी आणि बारावीच्या एकूण ६ लाख १३ हजार १२२ विद्यार्थ्यांना शुल्कमाफी, शुल्क प्रतिपूर्ती मिळणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला. यंदा राज्यात कमी पाऊस पडल्याने राज्यभरातील ४० तालुक्यांसह १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त भागातील दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ, शुल्क प्रतिपूर्ती करण्याची योजना आहे. त्या अनुषंगाने दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांनी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधण्याबात राज्य मंडळाने विद्यार्थ्यांना, तसेच त्यासंदर्भातील कार्यवाहीबाबत शाळांना सूचना दिल्या आहेत.

दुष्काळग्रस्त भागातील दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांच्या शुल्कमाफी, शुल्क प्रतिपूर्तीसाठी ३२ कोटी ७ लाख ९७ हजार ४७५ रुपयांचा निधी आवश्यक असल्याचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागाच्या योजना विभागाकडून सादर करण्यात आला होता.

टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

राजदंड / पिंपरी

समोरून जाणाऱ्या दुचाकीला टेम्पोने धडक दिली. त्यामध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. त्यातच दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. हा अपघात गुरुवारी (दि. २८) सकाळी पुणे-नाशिक महामार्गावर कुरुळी येथे घडला. उमेश देवानंदसिंग जाधव (वय २५, रा. भोसरी. मूळ रा. बुलढाणा) असे मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याप्रकरणी संदीप दोघू चौधरी (वय ४२, रा. भोसरी) यांनी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार टेम्पो चालक गणेश किसन चोपाडे (वय २९, रा. चिंबळी फाटा, ता. खेड) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी चौधरी आणि उमेश जाधव हे एकाच कंपनीत काम करत होते. गुरुवारी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास जाधव हे पुणे-नाशिक महामार्गावरून जात होते. ते कुरुळी येथे आले असता त्यांच्या पाठीमागून भरधाव आलेल्या एका टेम्पोने जाधव यांच्या दुचाकीला धडक दिली. जाधव हे रस्त्यावर पडले. त्यानंतर टेम्पोचे चाक जाधव यांच्या डोक्यावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. महाळुंगे एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.

शेतात सापडले ११ लाखांचे द्रवरूप 'क्लोरोफार्म'

'एमडी'साठीचा कच्च्या मालाचा साठा; तासगाव तालुक्यातील घटना

राजदंड / सांगली

एमडी अंमली पदार्थासाठी लागणारा ११ लाखांचा कच्च्या मालाचा साठा मांजर्डे (ता. तासगाव) येथील शेतातील पर्त्याच्या शेडमधून रविवारी सायंकाळी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग आणि तासगाव पोलीसांच्या पथकाने जप्त केला. इरळी (ता. कवठेमहांकाळ) येथील शेतात मुंबई पोलीसांनी छापा टाकून मेफड्रोन अंमली पदार्थ निर्मितीचा कारखाना दि. २३ मार्च रोजी उघडकीस आणला होता. यावेळी सहा जणांना पोलीसांनी अटक केलेली होती. यापैकी प्रसाद मोहिते याच्या मांजर्डे येथील रानात पर्त्याच्या शेडमध्ये संशयास्पद मालाचा साठा करण्यात आल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे रविवारी छापा टाकण्यात आला.

या ठिकाणी एमडीमध्ये वापरण्यात येत

असलेल्या द्रवरूप क्लोरोफार्म १५ बॅरेल आणि संशयित द्रव पदार्थाचे ४० लिटरचे १२ कॅन या ठिकाणी मिळाले. याची किंमत ११ लाख ३६ हजार ३७० रूपये आहे. याचा वापर इरळी येथे एमडी तयार करण्यासाठी करण्यात येत होता. संशयित आरोपी सध्या मुंबई गुन्हे अन्वेषण विभागाच्या ताब्यात आहेत.

सहा आरोपीपैकी प्रविण उर्फ नागेश शिंदे रा. बलगवडे आणि प्रसाद मोहिते यांच्यात नातेसंबंध असून यातूनच हा साठा मांजर्डे येथील शेतात करण्यात आला होता अशी प्राथमिक माहिती मिळाली आहे.

'पन्हाळगड' वारसा स्थळांच्या नामांकन यादीत

प्रधान सचिव विकास खारगे यांनी केली ऐतिहासिक इमारतींची पाहणी

राजदंड / पन्हाळा

'पन्हाळगड' जागतिक वारसा स्थळांच्या नामांकन यादीत गेल्याने पन्हाळगडाचे नाव जगाच्या नकाशात जाणार आहे. येथील पर्यटन वाढी बरोबरच व्यवसाय वृद्धी होणार असल्याने याचा फायदा स्थानिक नागरिकांना मिळणार आहे, असे महाराष्ट्र

राज्याचे प्रधान सचिव विकास खारगे यांनी सांगितले. राज्य शासनाने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत (पान २ वर)

> "पन्हाळगड वारसा स्थळांच्या यादीत जाण्यामुळे येथील स्थानिक रहिवाशांचे अथवा शासकीय कार्यालयांचे स्थलांतर केले जाणार नाही. नागरिकांच्या सहभागातूनच नवीन सुधारणा होणार आहेत. त्यामुळे स्थानिकांनी कोणताही गैर समाज करून घेऊ नये. अथवा अफवांवर विश्वास ठेऊ नये.
>
> – विकास खारगे,
> प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य

गडाला पूर्वीचे वैभव देणार

पाहणी नंतर खारगे म्हणाले, गडावर आजही भरपूर ऐतिहासिक इमारती अस्तित्वात आहेत. त्या इमारती गडावरील छत्रपतींच्या वास्तव्याचा, ऐतिहासिक व पौराणिक ठेवा आहे. त्याचे संवर्धन करून गडाला पूर्वीचे वैभव देण्यासाठी भारतीय पुरातत्व विभागाने योजना आखली आहे. त्या प्रमाणे ती सर्व कामे केली जाणार आहेत. पण पन्हाळगडावर नागरी वस्ती आहे. म्हणूनच ऐतिहासिक ठेव्याबरोबरच येथील स्थानिक नागरिकही तितकेच महत्वाचे आहेत. त्यामुळे गडावर भविष्यात राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना, करण्यात येणाऱ्या बदलासाठी स्थानिक लोकांचे मत घेतले जाणार आहे. यामध्ये स्थानिक लोकांना सहभागी करून घेतले जाईल, असे सांगितले.

महादेव जानकरांना सांगा, मी तुमची वाट बघतोय!

पंतप्रधान मोदींनी फडणवीसांकडे पाठवला खास संदेश

राजदंड / परभणी

महादेव जानकर हे परभणीतून लोकसभा निवडणूक लढवणार हे माहिती झाल्यानंतर नरेंद्र मोदींनी त्यांच्यासाठी एक खास संदेश दिला. जानकरांना सांगा, मी त्यांची लोकसभेत वाट पाहतोय असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदींनी परभणीकरांना दिल्याचं राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. महादेव जानकरांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी परभणीत हजेरी लावली. त्यावेळी महायुतीच्या नेत्यांनी मोठं शक्तिप्रदर्शन केलं. त्यावेळी देवेंद्र फडणवीसांनी ही माहिती दिली.

जानकरांची वाट पाहतोय, मोदींचा संदेश घेऊन फडणवीस परभणीत

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी रिझर्व्ह बँकेच्या एका कार्यक्रमासाठी मुंबईत आले होते. त्यावेळी त्यांनी निवडणुकीचं काय सुरू आहे याची माहिती विचारली. तुम्ही इथून गेल्यानंतर आम्ही महादेव जानकरांचा फॉर्म भरायला परभणीत जाणार आहोत अशी माहिती आम्ही मोदींना दिली. त्यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले, जानकरांना सांगा, मी त्यांची १८ व्या लोकसभेत वाट पाहतोय. परभणीच्या लोकांना सांगा जानकरांना दिल्लीला पाठवण्याची आता त्यांची जबाबदारी आहे.

मोदींचा संदेश मी तुमच्यापर्यंत घेऊन आलोय. मोदींसाठी जाकरांनासारखा एक खासदार तुम्ही दिल्लीला पाठवणार का? असा देवेंद्र (पान २ वर)

रामलीला मैदानावरचा मेळावा म्हणजे 'भ्रष्टाचाऱ्यांचा महामेळा'

भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची टीका

राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे

दिल्लीतील रामलीला मैदानावर रविवारी झालेला इंडी आघाडीचा मेळावा हा भ्रष्टाचार्यांचा महामेळा होता. या महामेळ्यात सहभागी झालेल्या नेतेमंडळींनी किती प्रयत्न केले तरी त्यांच्यावर कारवाई होणारच, असा घणाघात भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सोमवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान यावेळी उपस्थित होते.

उपाध्ये म्हणाले की, या महामेळ्यात घोटाळ्याचे अनेक आरोप असलेली नामवंत मंडळी एकत्र आली होती. देश लुटण्याचा आरोप असणारे अनेक नेते दिल्लीतल्या मेळाव्यात एकत्र आले होते. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनीही या महामेळ्याला उपस्थिती लावली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील भ्रष्टाचार निपटून काढण्याचा निर्धार केला आहे. इंडी आघाडीने मात्र 'भ्रष्टाचारी बचाव' असा नारा देऊन आपले खरे रूप देशाला दाखवले आहे. इंडी आघाडीच्या नेत्यांनी कितीही कांगावा केला तरी न्यायव्यवस्थेने त्यांच्यावरच्या आरोपांना पुष्टी दिली आहे. कितीही कांगावा केला तरी या नेतेमंडळींना लोकसभा निवडणुकीत आपापल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांवर मतदारांना उत्तरे द्यावी लागणार आहेत.

यावेळी उपाध्ये यांनी इंडी आघाडीतील प्रमुख नेत्यांवर असलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांचा पाढा वाचून दाखवला. अरविंद केजरीवाल, हेमंत सोरेन, मनीष सिसोदिया, सत्येंद्र जैन, खा.संजय सिंह या मंडळींना न्यायालयाने जामिन देण्यास नकार दिला आहे. यावरूनच त्यांचा घोटाळ्यातील सहभाग सिद्ध होतो. सोनिया गांधी, राहुल गांधी, लालूप्रसाद यादव यांच्यावरही भ्रष्टाचाराचे खटले चालू आहेत, असे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना राज्यात कोरोना काळात अनेक घोटाळे घडले. दिल्लीमध्ये घडलेला मद्य घोटाळा महाराष्ट्रातही करण्याची तयारी 'मविआ' सरकारच्या काळात चालू होती का, याची उत्तरे उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना आगामी काळात द्यावी लागणार आहेत, असेही उपाध्ये यांनी नमूद केले.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आमच्यासाठी फक्त 'कमळ' हाच उमेदवार : जगदीश मुळीक

राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे

'अन्य पक्षांप्रमाणे आमच्या पक्षातील निवडणुकीत उमेदवारीसाठी स्पर्धा, चुरस असते. पक्षाची उमेदवारी फक्त एकालाच मिळते. पण भारतीय जनता पक्षात उमेदवारीसाठीही चुरस असते. पण उमेदवाराच्या नावाची घोषणा झाल्यानंतर मी काय किंवा मुरलीधरआण्णा काय आमच्या सर्वांसाठी फक्त कमळ हाच उमेदवार असतो. त्याच्या विजयासाठीच सर्वजण प्रयत्न करतो. यावेळीही माझ्यासह आपण सर्वांनी सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपेक्षा जास्त मताधिक्य देण्यासाठी पुढील सर्व दिवस कार्यरत राहू', असे आवाहन माजी आमदार आणि भाजपचे माजी शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी वडगाव शेरीतील मेळाव्यात केले.

वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे, महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, माजी आमदार बापूसाहेब पठारे, शिरूर पंचायत समितीचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र जासुद, हवेली बाजार समितीचे माजी उपसभापती राजेद्र कंद, हवेली बाजार समितीचे संचालक नानासाहेब आबनावे, भाजपाचे तालुका अध्यक्ष आबासाहेब सोनावणे, जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य राहुल पाचरणे, भाजपा जिल्हा युवा मोर्चाचे अध्यक्ष संदीप सोनावणे, नगरसेवक राहुल भंडारे, सचिन पलांडे, रोहित खैरे, केशव पाचरणे, संतोष भरणे, सचिन सातपुते, अनिल नवले यांच्यासह श्रीगोंदा-पारनेर-हवेली तालुक्यातील वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात रहायला असलेले नागरीक, तरूण मोठ्या संख्येने मेळाव्याला उपस्थित होते.

जगदीश मुळीक म्हणाले, 'ही निवडणूक देशासाठी फार महत्वाची आहे. कारण आपण सन २००४ ते २०१४ काँग्रेस-युपीएचे सरकार आणि २०१४ ते २०२४ भाजपचे एनडीएचे सरकार देशात बघितले आहे, अनुभवले आहे. गेल्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने देशात विकासाची कामे केली. पण कोणीही विरोधक भ्रष्टाचाराचा आरोप करू शकत नाही. या उलट सर्वसामान्य व्यक्तींशी सहजपणे संवाद साधणारा पंतप्रधान देशवासीयांनी प्रथमच बघितला. काय करणार यापेक्षा काय केलं, हे सांगणारे सरकार मोदी यांनी दिले असल्यानेच त्यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी देशवासी उत्सुक आहेत. त्यात आपण वडगावशेरीतील सर्वांनी आपला वाटा उचलूयात आणि कमळ फुलवत मुरलीधर मोहोळ यांनी प्रचंड मताधिक्याने दिल्लीत पाठवू या'.

आमदार सुनील टिंगरे म्हणाले, 'वडगाव शेरी आणि नगर रोड परिसरातील नागरीकांसाठी भामा आसखेडमधून पाणीपुरवठा करणार, असे आम्ही ऐकत होतो. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या विषयाला चालना दिली. एक गोष्ट सांगितलीच पाहिजे की महापौर म्हणून मुरलीधर मोहोळ हेसुद्धा यासाठी किती आग्रही होते, हे मी बघितले आहे. जनहिताच्या प्रश्नांसाठी सातत्याने प्रयत्न करणारा एक चांगला उमेदवार आपल्याला त्यांच्या रूपाने मिळालेला आहे. ते निवडून येतीलच, पण आता त्यांना जास्त मताधिक्य देणे ही माझ्यासह आपली सर्वांची जबाबदारी आहे.

भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्षांच्या महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ म्हणाले, मी एक कार्यकर्ता आहे. आमच्यासाठी देश सर्वप्रथम, नंतर पक्ष असतो. पुण्यात विकासाला मोठा निधी मिळू शकतो आणि पुण्याचा महापौर म्हणून काम करताना विकासाची सर्वाधिक संधी ही वडगावशेरी मतदार संघात आहे. असे माझे मत आहे. त्यामुळे या परिसरात मेट्रोचे विस्तारीकरण, आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि त्यासाठीच्या पायभूत सुविधा विकसित करण्यासाठी माझे प्राधान्य असेल.

मेळाव्यात सर्वच मान्यवरांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

आलिशान गाडी, अंगावर लाखोंचे सोने, लखपती 'गोल्डमॅन'ला पोलिसांनी दाखवला इंगा

राजदंड / पुणे

कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही, असे नेहमीच म्हटले जाते. पण कधीकधी समोरची व्यक्ती बघून कायद्याची अंमलबजावणी करणारी व्यक्ती कायद्याला दुय्यम मानते. एखादी श्रीमंत, प्रतिष्ठित व्यक्ती समोर दिसल्यास कायदा बाजूला ठेवून त्या व्यक्तीला अभय दिले जाते. आपल्याकडे वाहतुकीचे नियम अतिशय कडक आहेत. पण कधीकधी याच नियमांना फाट्यावर अनेकदा फाट्यावर मारले जाते. तशी अनेक प्रकरणं समोर आलेली आहेत. सध्या पोलिसांनी एका गोल्डमॅनला दाखवलेल्या पोलिसी खाक्याची चांगलीच चर्चा होता. अंगार लाखो रुपयांचे असलेल्या या गोल्डमॅनला कायद्यासमोर झुकावे लागले आहे.

नियमांचे उल्लंघन केल्यामुळे एका गोल्डमॅनला पोलिसांनी दंड ठोववला आहे. पुण्यातील सांगवी पोलिसांनीकेलेल्या या कारवाईचा व्हिडीओ सध्या चांगलाच व्हायरल होत आहे. व्हिडीओत दिसणाऱ्या गोल्डमॅनने आपल्या कारच्या काचेला काळ्या रंगाची फिल्मिंग केली होती. कायद्यानुसार गाडीच्या काचांना अशा प्रकारे रंगवणे गुन्हा आहे. मग काय सांगवी पोलिसांनी या गोल्डमॅनला कायदा काय असतो, हे सांगितले आहे. या गोल्ड मॅनला पोलिसांनी थेट तीन हजार रुपयांचा दंड ठोठवला आहे.

व्हिडीओतील गोल्डमॅनकडे ऑडी ही महागडी कार आहे. त्याच्या कारला त्याने सोनेरी रंग दिलेला दिसतोय. दुसरे म्हणजे त्यांच्या अंगावरही लाखो रुपयांचे सोने आहे. मात्र कायद्यापुढे सगळे समान आहेत, हे तत्त्व समोर ठेवून सांगवी पोलिसांनी त्याला पोलिसी खाक्या दाखवला आहे. भर रस्त्यात त्याची कार थांबवून नियम मोडल्याबद्दल पोलिसांनी या गोल्ड मॅनला दंड ठोठवला आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईचा व्हिडीओ सध्या चर्चेचा विषय ठरत असून तो मोठ्या प्रमाणात शेअर केला जातोय.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर

भरारी पथकाकडून १ लाख ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त

राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे

आगामी लोकसभा निवडणुक २०२४ च्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथकाने मावळ तालुक्यातील सिंहगड, कासुर्डे, शिरगाव व अंबी या ठिकाणी अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मितीच्या ३ ठिकाणांवर दारूबंदी गुन्ह्याअंतर्गत छापे मारून ३ गुन्ह्यांची नोंद करून १ लाख ४४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या कारवाईत १०५ लिटर तयार गावठी हातभट्टी दारु, ३ हजार ६०० लिटर रसायन व गावठी हातभट्टी दारु निर्मीतीचे इतर साहीत्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यापुढेही अवैध दारु व्यवसायाविरुद्ध अशाच प्रकारच्या मोहिमा आखून सातत्याने कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाने नमूद केले आहे.

या कारवाईत दुय्यम निरीक्षक ए. बी. पाटील, व्हि.एम. माने, जवान पी. टी. कदम, एस.एस. पोंधे, ए. आर. थोरात, एस.सी. भाट, आर. टी. तारळकर व महिला जवान यु.आर. वारे यांनी सहभाग घेतला. गुन्ह्याचा तपास राज्य उत्पादन शुल्कच्या विभागीय भरारी पथकाचे दुय्यम निरीक्षक व्हि. एम. माने व दुय्यम निरीक्षक ए.बी. पाटील करीत आहेत.

मुरलीधर मोहोळ यांनी घेतली सुनील देवधर यांची भेट

राजदंड न्यूज नेटवर्क / पुणे

भारतीय जनता पार्टीचे माजी राष्ट्रीय सचिव सुनील देवधर यांची त्यांच्या निवासस्थानी पुणे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी देवधर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागतपर सन्मान केला आणि विजयासाठी सदिच्छा दिल्या. यावेळी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध विषयांवर संवाद झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं विकसित भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी आगामी लोकसभा निवडणुकीत पुणे लोकसभा मतदारसंघात मोठ्या विजयाचा निर्धारही दोघांनी व्यक्त केला.

दरम्यान, पुणे लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी सुनील देवधर इच्छुक होते. त्यांनी उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न केले. विविध कार्यक्रम आयोजित करुन इच्छुक असल्याचे दर्शविले होते. पक्षाने मोहोळ यांना उमेदवारी दिली. त्यामुळे देवधर नाराज असल्याची चर्चा होती. आता मोहोळ यांनी भेट घेतल्याने देवधर यांची नाराजी दूर झाल्याचे समजते. तर, राज्यसभेचे माजी खासदार आणि भाजपा नेते संजयनाना काकडे अद्यापही नाराज असल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली आहे. काकडे यांच्याप्रमाणेच अनेकजण मोहोळ यांच्या उमेदवारी बाबत नाराज असल्याचे सांगण्यात येत आहे. वडगांवशेरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार जगदीश मुळीक हे सुद्धा भाजपची उमेदवारी मिळविण्यासाठी आग्रही होते. मात्र, त्यांनाही पक्षाने दूर केले.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर प्रवास करताय! वेगावर नियंत्रण ठेवा, अन्यथा कारवाई

राजदंड / वडगाव मावळ

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रस्ते विकास महामंडळाच्या वतीने अपघातग्रस्त ठिकाण, वाहतूक कोंडीच्या ठिकाण, टोलनाके, बोगदे आदी ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. प्रत्येक १० किलोमीटरच्या अंतरावर हे कॅमेरे बसविण्यात आले आहे.या कॅमेऱ्यांमुळे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई अटळ आहे.

पुणे मुंबई द्रुतगतीलमहामार्गावर प्रवास करताना वाहनचालकांचे वेगावर नियंत्रण राहत नाही दरम्यान वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होते त्यामुळे महामार्गावर अपघाताच्याही प्रमाणात वाढ झाली होती.या अपघातात आळा घालण्यासाठी मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर रस्ते विकास महामंडळाच्या वतीने अपघातग्रस्त विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

या कॅमेऱ्यांमुळे नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करणे महामार्ग पोलिसांना अधिक सोपे झाले आहे.नियमाचे उल्लंघन केले तर कारवाई अटळ असल्यामुळे अनेक वाहनचालकांचा शिस्त लागली आहे.

द्रुतगती मार्गावर हलक्या वाहनांसाठी वेग मर्यादा ताशी शंभर किलोमीटर असून टेम्पो, बससाठी ताशी ऐंशी तर जड वाहनासाठी ताशी साठ किलोमीटर अशी ठेवण्यात आली. याचे पालन पूर्वी केले जात नव्हते. परंतु, सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्याने कारवाईच्या भीतीने वेग मर्यादेचे पालन सर्वच वाहनचालक करु लागले आहेत.

वर्ष	अपघात	मृत्यू	जखमी
२०२२ -	३३	५०	१३०
२०२३ -	१५	२३	३४

"अपघातग्रस्त ठिकाणी 'सीसीटीव्ही' कॅमेरे बसविण्यात आले असल्याने वाहनचालकामचे वेगावर नियंत्रण राहत आहे. कारवाईमुळे वाहनचालकांना शिस्त लागत आहे. परिणामी द्रुतगती मार्गावरील अपघाताचे प्रमाण घटले आहे.

– आर. एल. भालचीम, पोलिस उपनिरीक्षक, महामार्ग पोलिस

त्याने गेल्या दोन वर्षांत द्रुतगती मार्गावरील अपघाताचे प्रमाण घटले आहे.

सोलापुरात ९ दिवस आंबेडकर जयंती उत्सव; २१ एप्रिलला मिरवणूक

मध्यवर्ती अध्यक्षपदी नागेश रणखांबे

राजदंड / सोलापूर

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्यवर्ती उत्सव व विश्वस्त समितीची नियोजन बैठक रविवारी डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलच्या मैदानावर पार पडली. या बैठकीत जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी नागेश रणखांबे यांची तसेच कार्याध्यक्ष व्यंकटेश भंडारे, सचिव प्रा. संघमित्रा चौधरी, खजिनदार अमोल धेंडे, ऑडिटर अनिल सोनकांबळे यांची निवड करण्यात आली.

बैठकीमध्ये सर्वच कार्यकर्त्यांनी बोलताना मिरवणुकीच्या वेळेस जाणीवपूर्वक काही मंडळ वाटेत जास्त वेळ थांबतात त्यामुळे मागच्या मंडळांना पुढे जाता येत नाही यावर यंदाच्या उत्सवात मध्यवर्ती विश्वस्त समितीने ठोस भूमिका घ्यावी, पोलीस प्रशासनाशी बोलावे, अशी मागणी केली.

सोलापूर शहरात ९ दिवसाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव करण्याचा निर्णय घेण्यात आला. १३ एप्रिल रोजी रात्री बारा वाजता महामानव डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना होईल त्यानंतर २१ एप्रिल रविवार रोजी भीम जयंतीची मिरवणूक काढण्याचा निर्णय झाल्याची माहिती राजा सरवदे यांनी दिली.

सुभानजी बनसोडे, राहुल सरवदे, राजा इंगळे, रवी गायकवाड, एडवोकेट संजीव सदाफुले, सुबोध वाघमोडे, अजित गायकवाड, अरुण भालेराव, श्रीशैल गायकवाड, प्रवीण निकाळजे, सुशील सरवदे, शशी कांबळे, राजा कदम, शिवम सोनकांबळे, पिंटू ढावरे, संध्या काळे, प्रमिला तूपलवंडे यांच्यासह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पश्चिम महाराष्ट्रात १२४ कोटींची थकबाकी

▪ पुणे जिल्ह्यात वीजबिलाचे १३३ कोटी रूपये थकित

राजदंड / सातारा

दैनंदिन जीवनासाठी अत्यावश्यक व मूलभूत गरज झालेल्या विजेचा वापर करून देखील सद्यस्थितीत पश्चिम महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक ८ लाख ८७ हजार घरगुती ग्राहकांकडे १२४ कोटी ६१ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी आहे. अर्थार्जनाच्या व्यवसाय व उद्योगांसाठी वीज आवश्यक असताना १ लाख ८ हजार व्यावसायिकांकडे ३७ कोटी ९५ लाख तसेच १६ हजार ५७० उद्योगांकडे १८ कोटी ६५ लाख रुपयांच्या वीजबिलांची थकबाकी आहे. पुणे जिल्ह्यातही १३३ कोटी रुपयांहून अधिक थकबाकी आहे.

थकबाकीची अशी आहे आकडेवारी

सध्या घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वर्गवारीमध्ये (कंसात ग्राहक) पुणे जिल्हा– १३३ कोटी ९३ लाख रुपये (६,६६,०१४), सातारा– ८ कोटी ८६ लाख (८८,३२७), सोलापूर– २२ कोटी ७८ लाख (१,४८,०५३), कोल्हापूर– ७ कोटी ९१ लाख (३८,००५) आणि सांगली जिल्ह्यात ७ कोटी ७२ लाख रुपयांची (७१,९४१) थकबाकी आहे.

वीजबिलांच्या वसूलीवरच महावितरणचा संपूर्ण आर्थिक डोलारा अवलंबून आहे. त्यामुळे वीजबिलाची थकीत रक्कम प्रत्येक ग्राहकांकडे कमी अधिक असली तरी सध्या घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक १० लाख १२ हजार ३५० ग्राहकांकडे १८१ कोटी २२ लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे गेल्या महिन्याभरापासून प्रादेशिक संचालक अंकुश नाळे पश्चिम महाराष्ट्रात दौऱ्यावर असून थेट शाखा कार्यालयांपर्यंत वीजबिल वसूलीचा आढावा घेत आहेत. सोबतच मुख्य अभियंता राजेंद्र पवार (पुणे), सुनील पावडे (बारामती) व परेश भागवत (कोल्हापूर) यांच्यासह सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचारी आणि विशेष पथके थकबाकी वसूलीसाठी 'ऑन फिल्ड' आहेत. 'ना नफा, ना तोटा' (रेव्हेन्यू न्यूट्रल) तत्त्वाने वीजसेवा देणाऱ्या महावितरण सध्या ग्राहकांकडे असलेल्या थकबाकीमुळे आर्थिक संकटात आहे. त्यामुळे वीजबिलांच्या थकबाकी वसुलीला वेग देण्यात



थकबाकीदारांनी भरले पुनर्जोडणीचे ५८ लाख

महावितरणकडून थकीत रक्कम किती आहे हे न पाहता नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची धडक कारवाई सुरु आहे. थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केला असेल तर नियमानुसार थकबाकीची संपूर्ण रक्कम तसेच पुनर्जोडणी शुल्क अधिक जीएसटी भरणे आवश्यक आहे. लघुदाब वर्गवारीतील सिंगल फेजसाठी २१० रूपये व थ्री फेजसाठी ४२० रुपये तसेच उपरी व भूमिगत वीजवाहिन्यांद्वारे दिलेल्या वीजजोडण्यांच्या पुनर्जोडणीसाठी सिंगल फेजसाठी प्रत्येकी ३१० रुपये व थ्री फेजसाठी प्रत्येकी ५२० रुपये (अधिक जीएसटी) असे शुल्क आहे. त्यानुसार पश्चिम महाराष्ट्रातील १७ हजार ३३९ ग्राहकांना थकबाकीची रक्कम भरल्यानंतर वीजपुरवठा पुन्हा जोडून घेण्यासाठी नियमानुसार ५७ लाख ६७ हजार रुपयांचे पुनर्जोडणी शुल्क भरावे लागले आहे.

पान १ वरून

इम्रान खान यांच्या १४ वर्षाच्या शिक्षेला उच्च न्यायालयात स्थगिती

भेटवस्तू विकल्याच्या आरोपाखाली १४ वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली. हेच प्रकरण पाकिस्तानमध्ये तोशाखाना म्हणून प्रसिद्ध आहे. राष्ट्रीय निवडणुकांपूर्वी अनेक शिक्षा सुनावण्यात आल्याने इम्रान खान तुरुंगात आहेत. त्यांना १० वर्षे कोणतेही सार्वजनिक पद धारण करण्यास अपात्र ठरवण्यात आले आहे.

इस्लामाबाद उच्च न्यायालयाने सांगितले की, ईदच्या सुट्टीनंतर मुख्य याचिका म्हणून युक्तिवाद आणि पुराव्यासाठी घेतले जाणाऱ्या शिक्षेवर अंतिम निर्णय होईपर्यंत या जोडप्याची शिक्षा स्थगित राहील. याबाबत पक्षाकडून निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे.

एक-दोन गुंठे जमीन खरेदी-विक्री शक्य

शासनाच्या ग्रामीण घरकुल योजना, अशा चार कारणांसाठीच एक-दोन गुंठे जमिनीची खरेदी-विक्री करता येणार आहे. त्यामुळे शेतकर्यांना दिलासा मिळाला आहे.

कायद्यात सुधारणा करण्याबाबतचे प्रारूप राज्य सरकारने १४ जुलै २०२३ रोजी जाहीर केले होते. या प्रारूपावर मागविण्यात आलेल्या हरकती, सूचना निकाली काढून प्रारूप अंतिम करण्याचे राजपत्र १४ मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आले. विहीर, शेतरस्ता, सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन केल्यानंतर किंवा थेट खरेदी केल्यानंतर प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असलेल्या शिल्लक जमिनीसाठी आणि केंद्र किंवा राज्य शासनाच्या ग्रामीण घरकुल योजनेच्या प्रयोजनासाठी तुकड्यातील जमिनींचा व्यवहार करता येणार आहे. मात्र, याकरिता जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज करावा लागणार आहे.

'पन्हाळगड' वारसा स्थळांच्या नामांकन यादीत

पन्हाळगडाचा समावेश करण्यासाठी पाठवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने येथील ऐतिहासिक इमारतींची पाहणी करण्यासाठी ते पन्हाळगडावर आले होते.

वारसा स्थळांच्या यादीत समावेशासाठी भारत सरकारने देशातील सर्वच राज्यांकडून प्रस्ताव मागितले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने बारा किल्यांचा प्रस्ताव दाखल केला होता. राज्य शासनाचा प्रस्ताव भारत सरकारने स्वीकारून वारसास्थळ समितीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्या प्रस्तावात पन्हाळगडाचा समावेश आहे. युनेस्कोचा पहाणी दौरा सप्टेंबर महिन्यात गडाला भेट देणार आहे. त्या अनुषंगाने राज्याच्या प्रधान सचिवांनी पन्हाळगडाला भेट दिली.

यावेळी पन्हाळा उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे, तहसीलदार माधवी शिंदे-जाधव, नगरपालिकेचे मुख्याधिकारी चेतन माळी, सार्वजनीक बांधकामाचे अहिरेकर, अमोल कोळी, भारतीय पुरातत्त्वचे अधीक्षक सुभा मुजुमदार, संचालक तेजस गर्गे, पुरातत्त्व सल्लागार योगेश कासार पाटील, अर्चना देशमुख, मंडळ संरक्षण सहायक जंगले यांच्यासह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

महादेव जानकरांना सांगा, मी तुमची वाट बघतोय!

फडणवीसांनी परभणीकरांना सवाल विचारला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बोर्डीकर, विटेकर, लोणीकर या तिघांची ताकत महादेव जानकर यांच्या पाठीशी आहे. मागच्या निवडणुकीत महाराष्ट्राने ४१ खासदार मोदींना दिले. यावेळी ४१ पेक्षा जास्त खासदार निवडून येतील. मोदींनी सर्वसामान्य घटकांचा सर्वांगिण विकास केलाय. जे विकसित देशांना जमले नाही ते मोदीजींनी करून दाखवले. सामान्यांकरता मोदीजींनी १० वर्षे दिलेत. पुढच्या ५ वर्षात भारत आणि महाराष्ट्र बदलणार आहे.

परभणीला एक विकास करणारा खासदार मिळाला तर सर्व बदलून जाईल. इथल्या पहिल्या खासदारांसाठी आम्हीच मतं मागितली होती. पण त्यांनी निवडून यायचे अन तुम्हाला आम्हाला, विकासाला अन संसदेला विसरून जायचे असं घडलंय. त्यामुळे आता महादेव जानकर यांना मत म्हणजे मोदींना मत आहे.

महादेव जानकर म्हणजे मूर्ती लहान आणि कीर्ती महान असल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते म्हणाले की, जानकरांनी माझ्यासोबत पाच वर्षे मंत्रिमंडळात काम केलं. त्यावेळी त्यांनी काही तक्रार केली नाही. सातत्याने आपल्या खात्याचं काम अतिशय नेटानं करायचे. पाच वर्षामध्ये त्यांच्यावर एक रुपयाचा डाग लागला नाही. हा माणूस मंत्रिमंडळात आला त्यावेळी फाटका होता, जन्मभर फाटकाच राहणार. म्हणूनच लोकांच्या मनामध्ये महादेव जानकरांचं स्थान आहे.

भोरच्या शेकडो तरुणांचा शिवसेना उद्धव ठाकरे गटात प्रवेश...

राजदंड / भोर

शिवसेना पक्षात फूट पडल्यानंतर सत्तेत असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा एक गट तर शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे वारस उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा दुसरा गट असून पक्ष व नेत्यावर असलेले प्रेम,आदर,निष्ठा तसेच विचारांचा वारसा मुळे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुका प्रमुख हनुमंत कंक यांच्या विशेष प्रयत्नाने व पक्ष वाढीसाठी असलेल्या तळमळीमुळे भोर शहरासह तालुक्यातील शेकडो तरुणांनी उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात रविवार (दि.३१) रोजी मुंबई दादर येथील झालेल्या विशेष कार्यक्रमात पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन आहेर शिवसेना उपनेते तथा महाराष्ट्र संपर्क प्रमुख रविंद्र मिर्लेकर यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.

यावेळी माजी आमदार शंकरराव भेलके यांचे नातु अनिल भेलके तसेच हिर्डोशी खोऱ्यातील सामाजिक कार्यकर्ते राजाराम वेणूपूरे, अनिल साठवडे, अजय रोमण, अतुल अंगणे, श्रीकांत खाटपे, निलेश बांदल, रुपेश मळेकर, दिपक भिकुले, सुशिल देशपांडे, प्रमोद मळेकर, विनोद वालगुडे ,किरण थोरवे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे भोर तालुका प्रमुख हनुमंत कंक, भोर विधानसभा प्रमूख सुनिल धाकड, जिल्हा प्रमुख शंकर मांडेकर, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहोळ उपस्थित होते.

या प्रवेशामुळे उद्धव ठाकरे गटाला बळ मिळणार आहे.

पुण्यात मुलाकडून आईला बेदम मारहाण

पुणे : घर नावावर करून देण्यास नकार दिल्याने आईच्या डोक्यात खुर्ची मारणाऱ्या मुलासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी मुलगा कपिल दीपक सकट, त्याची पत्नी पायल कपिल सकट (वय २६, दोघे रा. निम्हण मळा, पाषाण) याच्यासह सासू आणि मेहुण्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत यशोदा दीपक सकट (वय ५५, रा. जनवाडी, गोखलेनगर) यांनी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

यशोदा सकट यांचा मुलगा कपिल, त्याची पत्नी पायल, तिची आई आणि मेहुणा राहते घर नावावर करून देण्यासाठी त्रास देत होते. दोन दिवसांपूर्वी कपिल आणि त्याची आई यशोदा यांच्यात वाद झाला. वादातून त्याने आई यशोदा यांच्या डोक्यात खुर्ची मारून शिवीगाळ केली.

'चिन्ह'विरहित निवडणूक घेण्याची मागणी

■ पुण्यातील लोकसभा उमेदवार असलम बागवान यांचे निवेदन

राजदंड / पुणे

इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनच्या मतपत्रिकेवर उमेदवाराचा चेहरा,नाव आणि पक्षाचे नाव असल्याने चिन्हाची आवश्यकता नाही,त्यामुळे ते हटवून चिन्ह विरहीत निवडणूक घ्यावी,अशी मागणी लोकसेना पक्षाचे पुणे लोकसभा मतदार संघातील उमेदवार असलम इसाक बागवान यांनी केली आहे.यासंदर्भात बागवान यांनी पुणे जिल्हाधिकारी यांना आज सोमवारी सकाळी निवेदन दिले असून दि.२ एप्रिल रोजी दुपारी साडेतीन वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मूक आंदोलन करणार असल्याची माहिती दिली आहे.लोकसेना पक्ष,रयत कामगार संघटना,दलित मजदूर संघटना,मुस्लिम उलेमा संघटना यांनी या मूक आंदोलनाला पाठिंबा दिल्याची माहिती असलम बागवान यांनी दिली.

१ मे २०१५ रोजी निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयानुसार इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील मत पत्रिकेवर उमेदवाराचे फोटो लावणे निश्चित केले आहे, हा लोकतान्त्रिक आणि संविधान निर्णय आहे.पण फोटो बरोबर आता कोणत्याही आकृतीची (चिन्हाची) आता आवश्यकता नाही.कारण घटनेत पक्ष पार्टी,चिन्ह याचा कोठेही उल्लेख नाही. असे चिन्ह ठेवणे घटनाबाह्य होईल.त्यामुळे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील मत पत्रिकेवर असलेले चिन्ह हटवावे,असे बागवान यांनी निवेदनात म्हटले आहे.

'पुणे-नाशिक' द्रुतगतीच्या भूसंपादनाला विरोध...

राजदंड / पुणे

पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, राजुरी परिसरातील ग्रामस्थांनी या भूसंपादनाला प्रखर विरोध दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर राजुरी (ता. जुन्नर) येथील बाधित शेतकऱ्यांची बैठक झाली. या वेळी बाधित शेतकऱ्यांनी आपल्या समस्या मांडल्या.

राजुरीचे उपसरपंच माउली शेळके, ग्राहक पंचायतीचे प्रांत संघटन मंत्री बाळासाहेब औटी, वल्लभ शेळके, एम. डी. घंगाळे, दत्तात्रय हाडवळे, जी. के. औटी, अविनाश हाडवळे, मोहन नायकोडी आदींसह राजुरी, उंचखडक, गुंजाळवाडी, संतवाडी, कोळवाडी, आदी गावांचे शेतकरी उपस्थित होते. या बैठकीमध्ये शेतकर्यांनी या महामार्गास प्रखरपणे विरोध केला. या परिसरातील शेतकरी अल्पभूधारक असून, ते प्रामुख्याने शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. त्यामुळे महामार्गासाठी जमिनी गेल्यास त्यांना भूमिहीन व्हावे लागेल, अशी भीती बाधित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

हरकती व सूचना मागविल्या

यारिरोधात शेतकऱ्यांनी सह्यांची मोहीम सुरू केली आहे. गरज पडल्यास न्यायालयात दाद मागण्याचा इशारा देण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने ८ मार्च रोजी जाहीर प्रगटीकरण या महामार्गाच्या भूसंपादनासाठी हरकती व सूचना मागविल्या आहेत. त्यासाठी २१ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

उत्पादनाचे साधन राहणार नाही

बाळासाहेब औटी म्हणाले, राजुरी पट्ट्यातील शेतकरी अल्पभूधारक असून, त्यांचा मुख्य व्यवसाय शेती व दुग्ध व्यवसाय आहे. मात्र, त्यांच्या जमिनीतून महामार्ग गेल्यास शेतकऱ्यांकडे उत्पादनाचे साधन राहणार नाही. अनेक शेतकरी जमीन गेल्याने पूर्ण विस्थापित होणार आहेत. यापूर्वी देखील पिंपळगाव जोगा कालवा, कुकडी डावा कालवा, नगर-कल्याण महामार्गासाठी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. आता पुन्हा महामार्गासाठी भूसंपादन झाल्यास या पट्ट्यातील शेतकरी पूर्ण अडचणीत येणार आहेत.

'गंधर्व सुरांची शिलेदारी' नाट्य संगीत मैफिलीचे ६ एप्रिलला आयोजन

राजदंड / पुणे

भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'गंधर्व सुरांची शिलेदारी' या नाट्य संगीत मैफिलीचे दि.६ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आले आहे. 'मराठी रंगभूमी पुणे' या संस्थेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त हा कार्यक्रम 'गंधर्वभूषण जयराम शिलेदार संगीत नाट्य सेवा ट्रस्ट,पुणे' ही संस्था सादर करणार आहे.अस्मिता चिंचाळकर,चिन्मय जोगळेकर आणि निनाद जाधव हे गायन सादर करणार आहेत.संजय गोगटे(ऑर्गन),अभिजित जायदे (तबला) हे साथसंगत करणार आहेत. वर्षा जोगळेकर या निवेदन करणार आहेत. 'मराठी रंगभूमी, पुणे' या संस्थेच्या ७५ वर्षाच्या वाटचालीचे दर्शन या मैफलीत घडेल. सौभद्र, मानापमान, सुवर्णतुला या लोकप्रिय नाटकातील पदे सादर होतील, त्याप्रमाणे काही दुर्मिळ नाट्यपदे ऐकायची संधी या कार्यक्रमात मिळणार आहे.

हा कार्यक्रम शनिवार, दि. ६ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी साडे पाच वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे होणार आहे. हा कार्यक्रम विनामूल्य आहे.

कंत्राटी शिक्षक मानधनासाठी ११.३० कोटी

राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्तच

राजदंड / पुणे

राज्यामध्ये पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षक कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त करण्यात आले आहेत. या शिक्षकांच्या मानधनासाठी ११ कोटी ४० लाख रुपये खर्च झाला आहे. राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्तच आहेत. या पदांची भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कंत्राटी तत्त्वावर मानधनाने शिक्षक नियुक्त करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाकडून जुलैमध्ये घेण्यात आला होता. कंत्राटीसेवा बाब ही लाक्षणिक पुरवणी मागणीद्वारे विधानमंडळाच्या निदर्शनास आणून त्यास मान्यता मिळाली आहे.

रायगडमध्ये ६४, पालघरमध्ये ४६, रत्नागिरीत २२, सिंधुदुर्गमध्ये, ५३, जालन्यात २४९, बुलढाण्यात १८१, सांगलीत २७४, कोल्हापूरमध्ये ६३ या प्रमाणे एक हजार निवृत्त शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. या शिक्षकांच्या मानधनासाठी ११ कोटी ४० लाख रुपयांच्या निधीची आवश्यकता असल्याचे प्राथमिक शिक्षण संचालकांनी राज्य शासनाला कळविले होते. त्यानुसार निधीपैकी ८ कोटी इतका निधी उपलब्ध झाला असून, निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात आली असून, शिक्षकांच्या मानधनासाठी २०२३-२४ या आर्थिक वर्षात निधी वितरीत करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

कर्मवीर बाबासाहेब उर्फ मारुतराव माने पाटील यांची जयंती साजरी

राजदंड / अकलूज

माळशिरस तालुक्याच्या पंचायत समितीचे पहिले सभापती कर्मवीर बाबासाहेब उर्फ मारुतराव माने पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली.

कर्मवीर बाबासाहेब माने पाटील यांच्या जयंतीनिमित्त विजय चौकातील पुर्णाकृती पुतळ्यास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते पुष्पचक्र व पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी धैर्यशील मोहिते पाटील, माजी सरपंच किशोरसिंह माने पाटील, युगंधरा माने पाटील, नगरपरिषदचे मुख्याधिकारी दयानंद गोरे, माजी सरपंच विठ्ठलराव गायकवाड, माजी सदस्य तात्या गुळवे, उत्कर्ष शेटे, राहुल जगताप, विशाल मोरे, महादेव दळवी, संदीप गांधी, शंकरराव खंडागळे यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, नागरिक उपस्थित होते.

पुण्यात ६ एप्रिलला 'सत्संग सिनर्जी' कार्यक्रम

राजदंड / पुणे

कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन्स ऑफ इंडिया (क्रेडाई), इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल (आयजीबीसी), इंडियन प्लम्बिंग असोसिएशन (आयपीए), फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) आणि 'द इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनियर्स '(इशरे) यांच्या संयुक्त विद्यमाने 'सत्संग सिनर्जी' हा कार्यक्रम दि. ६ एप्रिल २०२४ रोजी पुण्यात होणार आहे.

'सत्संग सिनर्जी'च्या माध्यमातून पर्यावरण स्नेही,सुरक्षित आणि अधिक कार्यक्षम बांधकामासाठी परस्पर सहकार्याला चालना देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या नगररचना व मूल्यनिर्धारण संचालनालयाचे संचालक अविनाश पाटील,मराठा चेंबरच्या इलेक्ट्रॉनिक क्लस्टर फौंडेशन (एमईसीएफ) चे अध्यक्ष प्रदीप भार्गव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दि. ६ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत कृषी महाविद्यालय मैदान, शिवाजीनगर येथे होणार आहे. कार्यक्रमासाठी नोंदणी विनामूल्य आहे. इच्छुक व्यक्तीनी https://allevents.in/pune / satsang - synergy या लिंकचा वापर करून नोंदणी करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्धवट कामाची ना खंत, ना काळजी!

साताऱ्यातील यादोगोपाळ पेठेतील गोल मारूती मंदिर चौकात पाण्याची पाईपलाईन दुरुस्तीचे काम महिनाभर अर्धवट अवस्थेत आहे. वर्दळीचा हा भाग वाहतुकीसाठी वारंवार कोंडीला सामोरे जातो. त्यातच या अर्धवट कामामुळे वाहनचालकांना व नागरिकांना येथे जीव मुठीत घ्यावा लागत आहे. (छाया : अतुल देशपांडे, सातारा)

वडार समाज लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकणार

'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेचे राज्य उपाध्यक्ष शंकर चौगुले यांचा सरकारला इशारा

राजदंड / सोलापूर

राज्यात अनेक जिल्ह्यांत वडार समाजाची निर्णायक मते आहेत; परंतु सरकारने दिलेल्या आश्वासनांची पुर्तता न झाल्याने 'मी वडार महाराष्ट्राचा' या संघटनेच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदार संघांतील मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशारा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष शंकर चौगुले यांनी पत्रकार परिषदेत दिला.

सोलापूर येथे २०१८ मध्ये वडार समाजाचा राज्यस्तरीय मेळावा घेण्यात आला होता. यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वडार समाजाच्या विकासासाठी वेगवेगळ्या घोषणा केल्या; परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. फडणवीस यांनी वडार समाजाचा एस. टी. प्रवर्गात समावेश करू, समाजाच्या वस्तीची जागा त्यांच्या मालकीची करू, समाजातील तरुणांना रोजगार देऊ, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी स्वतंत्र आश्रमशाळा व वसतिगृह सुरू करू, मजूर सोसायट्यांना १० टक्के कामे आरक्षित ठेवू, तरुणांनी उद्योग-व्यवसाय करावा म्हणून पैलवान मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ स्थापन करू आदी विविध आश्वासने दिली होती, परंतु त्याची पुर्तता झाली नाही, असे चौगुले यांनी सांगितले.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रवी शिंदे, जिल्हाध्यक्ष गौतम भांडेकर, जिल्हा संपर्कप्रमुख सुनील साळुंके, शहराध्यक्ष सिद्धा मंजेली, सचिव अनिल चौगुले, सुनील शिंदे, माजी नगरसेवक विनायक विटकर, नगरसेविका प्रतिभा मुदगल जिल्हा लेबर फेडरेशन संचालक संजय साळुंखे, खाण कामगार संघटनेच अध्यक्ष लक्ष्मण विटकर उपस्थित होते.

केवळ मतांसाठीच वापर

सत्ताधाऱ्यांनी वेळोवेळी आश्वासने देऊन वडार समाजाचा केवळ मतांसाठीच वापर केला आहे. सत्तेवर आल्यानंतर मात्र आश्वासनांची पूर्तता केली जात नाही. त्यामुळे अश राजकारण्यांच्या विरोधात वडार समाजाने एल्गार पुकारला असून कोणत्याही परिस्थितीत बहिष्कारापासून मागे हटणार नाही, असे चौगुले यांन सांगितले.

शिंगणापूर यात्रेसाठी प्रशासन यंत्रणा सज्ज - प्रांताधिकारी गाडेकर

प्रशासनाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन

राजदंड / दहिवडी

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिखर शिंगणापूर येथील शंभू महादेवाची वार्षिक चैत्रयात्रा ९ ते २३ एप्रिल याकालावधीत होत असून यात्रेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याची माहिती माणच्या प्रांताधिकारी उज्ज्वला गाडेकर यांनी केले. भाविकांनी यात्राकाळात निवडणूक आचारसंहिता व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून यात्रा उत्साहात साजरी करण्याचे आवाहन प्रांताधिकारी गाडेकर यांनी केले.

शिंगणापूर यात्रेच्या पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या नियोजन बैठकीस पोलीस उपअधीक्षक अश्विनी शेंडगे, माणचे तहसीलदार विकास अहिर, गटविकास अधिकारी प्रदीप शेंडगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक, अक्षय सोनवणे, शिंगणापूरच्या सरपंच सारिका शेंडे, उपसरपंच राजेंद्र पिसे, माजी सरपंच राजाराम बोराटे, देवस्थानचे व्यवस्थापक मंदार पत्की, कावडीधारक भाविक यांसह विविध खात्यांचे अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील मोठ्या यात्रांमध्ये शिंगणापूर यात्रेचा समावेश होतो. दरवर्षी गुढीपाडवा ते पौर्णिमा या कालावधीत भरणाऱ्या शिंगणापूर यात्रेसाठी मराठवाडा, विदर्भ, खानदेश, आंध्र, कर्नाटक मधून ७ ते ८ लाख भाविक येत असतात. यावर्षी दुष्काळी परिस्थिती असल्याने यात्रेसाठी १० शासकीय टँकर, जिल्ह्यातील नगरपालिका व स्वयंसेवी संस्थांचे २० असे जवळपास ३० टँकर यात्रेसाठी उपलब्ध करून दिले जाणार असून आंधळी धरण याठिकाणी टँकर भरण्याची सोय करण्यात येणार आहे. आरोग्य विभागाने १० आरोग्य पथके, सुसज्ज असलेल्या रुग्णवाहिका यात्रेसाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रांताधिकारी गाडेकर यांनी आरोग्य विभागास दिल्या. याशिवाय वीज कंपनीने यात्राकाळात २४ तास वीजपुरवठा सुरू ठेवावा, ग्रामपंचायत, बांधकाम विभाग तसेच देवस्थान समितीने वाहतुकीस अडथळा ठरणारी अतिक्रमणे यात्रेपूर्वी काढून टाकावीत, यात्रा परिसरात अडथळा करणाऱ्या स्टॉलधारकांवर कारवाई करावी, शिंगणापूरकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांची बांधकाम विभागाने दुरुस्ती करावी, एसटी महामंडळाने भाविकांच्या संख्येच्या प्रमाणात जादा गाड्यांची संख्या वाढवावी, तसेच भाविकांना सोयीसुविधा देण्यासाठी सर्व विभागांनी सतर्क राहण्याच्या सूचना प्रांताधिकारी गाडेकर यांनी संबंधित विभागांना दिल्या. यात्राकाळात लोकसभा निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने भाविकांनी स्वयंशिस्त पाळून यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन गाडेकर यांनी बैठकीत केले.

ग्रामपंचायतीमार्फत भाविकांना सर्व प्रकारच्या सोयीसुविधा पुरविण्यात येणार असल्याचे राजाराम बोराटे यांनी सांगितले. बैठकीस ग्रामपंचायत सदस्य, वीरभद्र कावडे, मोहन बडवे यासह सर्व प्रशासकीय विभागाचे अधिकारी, कावडप्रमुख भाविक, ग्रामस्थ उपस्थित होते.

मुंगीघाट परिसरात विशेष बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून कावडधारक भाविकांनी स्वयंशिस्तीचे पालन करून दिलेल्या वेळेनुसार दर्शन घ्यावे, कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून भाविकांनी यात्रा शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पोलीस उपअधीक्षक अश्विनी शेंडगे यांनी केले.

असा राहणार बंदोबस्त

शिंगणापूर यात्रेच्या बंदोबस्तासाठी एक पोलीस उपअधीक्षक, ५ पोलीस निरीक्षक, ४० पोलीस अधिकारी, २५० पोलीस कर्मचारी, ७० वाहतूक पोलीस, १५० होमगार्ड तैनात करण्यात येणार असल्याचे दहिवडीचे उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी शेंडगे, सहायक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे यांनी सांगितले.

परिसरात फटाके फोडण्यास निर्बंध

पाण्याचे टँकर, शिद्याची वाहने वगळता अन्य छोट्या वाहनांना यात्रा परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. भाविकांच्या सोयीसाठी नातेपुते, फलटण, म्हसवड रस्त्यावर पार्किंगची सोय करण्यात येणार आहे. भाविकांना यात्रा परिसरात फटाके फोडण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.

गणेश जाधव यांना उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार जाहीर

राजदंड / वडूज

माण तालुक्यातील दिवडी गावचे रहिवाशी, मुंबईतील सातारा जिल्हा रहिवाशी संघाचे संस्थापक गणेश जाधव यांना भारत उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार जाहीर झाला आहे.

कोपरखैरणे, मुंबई येथे राहणाऱ्या गणेश जाधव यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण २१ एप्रिल रोजी दिल्ली येथे करण्यात येणार आहे. राष्ट्रीय अँटिकरप्शन बोर्ड सामाजिक संस्था, लाईन टाइम्स दिल्ली, युनिटी ऑफ प्रेस अँण्ड मीडिया असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार देण्यात येणार असल्याचे गणेश जाधव यांनी सांगितले.

दिल्ली येथे होणाऱ्या कार्यक्रमात हा पुरस्कार दिला जाणार आहे. या पुरस्काराबद्दल जाधव यांचे अभिनंदन होत आहे.

चंदगड तालुक्यात तुकाराम बीज सोहळा उत्साहात साजरा

राजदंड / चंदगड

चंदगड तालुक्यातील कोवाड, किणी, निट्टूर, गंधर्वगड-केरवडे, अडकूर, शिनोळी, तुर्केवाडी, माणगाव, बागिलगे आदी गावांमध्ये संत तुकाराम महाराज बीज सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासून भजन, किर्तन, हरीपाठ असे विविध धार्मिक कार्यक्रम झाले.

दुपारी बारा वाजता तुकाराम महाराजांच्या फोटो प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

उन्हाचा भडका आणि जंगले गिळत चाललेले वणव्यांचे संकट

जागतिक तापमानवाढीचे संकट दारात उभे असताना आधीच कमी झालेल्या जंगलांचे क्षेत्र वणव्यांच्या तोंडी सापडू देणे परवडणारे नाही.

गेली काही दिवसांपासून तामिळनाडूच्या निलगिरीतील कुन्नूर वनक्षेत्रातीलजंगलातआगलागलेली आहे. जंगलातीलवणवे पसरण्यासाठी अनुकूल वातावरण आवश्यक असते. गरम तथा कोरडे तापमान आणि घनदाट उंच झाडी असेल तर जंगलातले वणवे धडकी भरेल, अशा गतीने पसरत जातात. गेल्या काही वर्षांत उन्हाळ्याची तीव्रता सतत वाढत जात असलेली आपण अनुभवतो आहोतच. जागतिक तापमान वाढीची चर्चा इतके दिवस केवळ त्या क्षेत्रातले कार्यकर्ते, विचारवंत, अभ्यासक आणि आंतरराष्ट्रीय परिषदांपुरतीच मर्यादित होती. आता हे संकट आपल्या दारात येऊन उभे ठाकले आहे. ते किती गंभीर आहे, याचा अंदाज हल्ली उन्हाच्या झळा सुरू झाल्या की आपल्या सर्वांना येतोच.

१९०१ नंतर २०२४ चा फेब्रुवारी महिना दक्षिण भारतातील सर्वांत उष्ण असा महिना होता. याशिवाय गेली दोन महिन्यांत दक्षिण भारतातील राज्यात कमाल, किमान आणि सरासरी असे तीनही प्रकारचे तापमान सामान्यत: वाढलेलेच होते. याचाच परिणाम होऊन थंडीच्या दिवसांतही या जंगलात वाढलेले लाकूड अधिक असल्यानेआगवेगाने पसरत आहे. यामुळेच आपल्याला नीलगिरीच्या डोंगरी भागात अशा प्रकारच्या घटना पाहायला मिळतात.

जंगलात अशा प्रकारे वणवे लागण्याचे सर्वांत मोठे कारण माणसाची बेपर्वाई असते. जळती काडी किंवा सिगारेटचे थोटूक फेकले जाणे, जंगलात अन्न शिजवणे, मध गोळा करण्यासाठी आग लावणे त्याचप्रमाणे बेकायदा शिकार करण्यासाठी, जनावरांना पळवून लावण्याकरिता आग लावणे अशी कारणे त्यात येतात. जंगलांना आग लागण्याची नैसर्गिक कारणे म्हणजे वीज पडणे, ज्वालामुखीचा स्फोट किंवा दुष्काळामुळे पाण्याचे नैसर्गिक प्रवाह आणि लाकूड सुकणे वगैरे. तापमानात वृद्धी आणि कमी पावसामुळे जंगलात वणवे लागण्याचा धोका वाढतो. भारतातील जंगलांचे सर्वेक्षण करण्यासाठी असलेली मध्यवर्ती संस्था 'फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया' यांच्या अभ्यासाचा निष्कर्ष असे सांगतो की, भारतात शुष्कपणा अधिक असलेल्या जंगलात आग लागण्याची शक्यता सर्वाधिक असते. त्याचवेळी सदाबहार, अर्ध सदाबहार तसेच पर्वतीय समशितोष्ण जंगलात तुलनात्मकदृष्ट्या आगीची शक्यता कमी राहते.

भारतात नोव्हेंबर २०२० पासून जून २०२१ पर्यंत जंगलात आग आणि वणवे लागण्याच्या ३,४५,९८९ घटना घडल्या आहेत. गेल्या पाच वर्षांतील ही संख्या सर्वाधिक आहे. भारतीय वन सर्वेक्षणाद्वारे ही आकडेवारी दिली गेली.

या सर्वेक्षणानुसार २०२१ मध्ये जंगलात आग लागण्याच्या घटना २.७ पटींनी वाढल्या. नोव्हेंबर २०२० पासून जून २०२१ पर्यंतच्या आगीच्या घटनांमध्ये काही मोठ्या होत्या तर काही छोट्या. लहान-मोठ्या सगळ्या घटना एकत्र करून हा आकडा समोर आला आहे.

भारत वन अहवालानुसार भारतात ३६ टक्क्यांपेक्षा अधिक वनक्षेत्र वणवे लागण्याच्या बाबतीत अत्यंत संवेदनशील आहे. भारतात ७१.३५ कोटी हेक्टर वनक्षेत्र असून त्यातील ३६ टक्क्यांपेक्षा जास्त वनक्षेत्र म्हणजेच २५.९३ कोटी हेक्टर क्षेत्र आगीच्या बाबतीत अधिक संवेदनशील आहे.

जागतिक स्तरावरील एकूण वनक्षेत्राच्या जवळपास तीन टक्के भारताचा हिस्सा किंवा साधारणत: ९.८ कोटी हेक्टर वनक्षेत्र २०१५ मध्ये आगीच्या लपेट्यात सापडले होते. जंगलात वणवे लागण्याच्या घटना जास्त करून उष्ण कटिबंधीय क्षेत्रात पाहायला मिळतात.

२०२१ मध्ये भारताच्या अनेक राज्यांमध्ये जंगलांना

आगी लागण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळाल्या होत्या. मार्च २०२३ मध्ये गोव्यात झाडांना आग लागण्याची घटना प्रामुख्याने चर्चेत होती. २०२४ मध्ये मिझोराममध्ये ३७३८,मणिपूरमध्ये १७०२, आसामात १६५२, मेघालयात १२५२, आणि महाराष्ट्रात १२१५ वणव्यांची नोंद झाली आहे. एकीकडे तापमान वाढीच्या संकटाशी लढणे सर्व स्तरावर तसे मुश्कील, आणि दुसरीकडे आधीच कमी होत चाललेल्या जंगलांचे क्षेत्र वणव्यांच्या तोंडी सापडू देणे आपल्याला परवडणारे नाही.

निलेश लंकेंचा विखेंवर जोरदार निशाणा; कार्यकर्त्यांना दिल्लीवारीचं आश्वासन

अहमदनगर - लोकसभा निवडमुकांसाठी उमेदवारांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर आता प्रचाराचा नारळ गावागावात फुटत आहे. दोन दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ५ उमेदवारांची नावे जाहीर झाली. त्यामध्ये नगर दक्षिणमधून निलेश लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे, येथीलम मतदारसंघातसुजय विखेविरुद्ध निलेश लंके असा सामना रंगणार आहे. त्याचसाठी, महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या स्वाभिमानी जनसंवाद यात्रा व प्रचाराचा शुभारंभ पाथर्डी तालुक्यातील मोहटादेवी येथे करण्यात आला. यावेळी, बोलताना लंकेंनी नाव न घेतासुजय विखेंवरटीका केली. तसेच, आत्तापर्यंत आपण तुम्हाला मुंबई दाखवली. आता, दिल्ली दाखवणार, असे म्हणत कार्यकर्त्यांना दिल्लीवारीचं आश्वासनही दिलं.

येथील सभेतून राशप प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी महायुतीच्या सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, गेल्या साठ वर्षात काँग्रेसने काय केलं. हे महायुतीचे नेते विचारतात. पण त्यापेक्षा त्यांनी दहा वर्षांमध्ये काय केलं हे सांगितलं. कोरोनाची महामारी आली. या महामारीत त्यांनी जनतेला टाळ्या वाजवायला सांगितलं. या महामारीत ५० लाख लोकांचा जीव गेला. त्यावर सरकार बोलत नाही.. तर, आपल्यातून काही सरदार तिकडे गेले. तिकडे गेलेल्या सरदारांना दिल्लीमध्ये सहाव्या रांगेमध्ये स्थान मिळालं, यापेक्षा दुसरे दुर्दैव नाही, अशी टीका जयंत पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी गटावर नाव न घेता केली. तर, निलेश लंके यांनीही नाव न घेता सुजय विखेंना लक्ष केले. तसेच, कार्यकर्त्यांना दिल्लीवारीचं आश्वासनही दिलं.

मोहोटादेवीचं दर्शन घेऊन आपण स्वाभीमान जनसंवाद यात्रेची सुरूवात केली असून नगरच्या विशाल गणपतीचं दर्शन घेऊन आपण या यात्रेचा समारोप करणार आहोत, त्यावेळी स्वत: शरद पवार उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती निलेश लंकेंनी दिली. आपल्या भागातील लोकांचे प्रश्न, मतदारसंघातील वेगेवगळ्या अडचणींची माहिती घेऊन ते प्रश्न सोडविण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. दुष्काळी आणि बेरोजगारी या दोन प्रश्नांवर काम करणार असून तरुणाईच्या हाताला रोजगार देण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे, असे निलेश लंकेंनी म्हटले.

तसेच, दुसऱ्याच्या झेंड्यावर पंढरपूर करणारे आहेत, काम आपण करायचे आणि नारळ त्यांनी फोडायाचा, अस काम चालतं. शेतकऱ्यांना वेढीस धरलं जातं, अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जातो. स्वत: काचेच्या घरात राहतात आणि दुसऱ्याच्या घरावर दगड टाकतात, असे म्हणत विखे पाटलांवर लंकेनी निशाणा साधला. हे देवीच्या दारातही आपली जहागिरी दाखवात. पण, आपण देवी मातेचा सच्चा भक्त आहे. देवीचं दर्शन घेतलं, आता डायरेक्ट दिल्ली. तुम्हाला सगळ्यांना घेऊन जातो दिल्लीला. मला अनेकजण म्हणतात अधिवेशन काळात किती लोकं आणतो रे, २०० ते ४०० लोकं घेऊन जातो मी अधिवेशनाला. आजपर्यंत तुम्हाला कोणी संसद दाखवली का, आता मी सगळा लोंढाच घेऊन जातो दिल्लीला, असे म्हणत लंकेंनी कार्यकर्ते व मतदारांना दिल्लीवारीचे आश्वासन दिलं. तसेच, मी जे बोलतो ते करतो, आणि जे करतो तेच बोलतो. भविष्यात मला संधी दिल्यास प्रत्येक तालुक्यात चखऊ उभी केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. बेरोजगारी कमी झाली पाहिजे, तरुणांना काम मिळालं पाहिजे, असे लंकेंनी म्हटले.

पन्हाळगड गतिक वारसा स्थळांच्या नामांकन यादीत गेल्याने होणार स्थानिकांचा फायदा : विकास खारगे

राजदंड न्युज नेटवर्क

पन्हाळा : पन्हाळगड जागतिक वारसा स्थळांच्या नामांकन यादीत गेल्याने पन्हाळगडाचे नाव जगाच्या नकाशात जाणार आहे. येथील पर्यटन वाढी बरोबरच व्यवसाय वृद्धी होणार असल्याने याचा फायदा स्थानिक नागरिकांना मिळणार आहे. त्यामुळे पन्हाळगड जागतिक वारसा स्थळांच्या नामांकन यादीत गेल्याने स्थानिकांचा फायदा होणार असलेचे महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव विकास खारगे यांनी सांगितले.ते राज्य शासनाने जागतिक वारसा स्थळांच्या यादीत पन्हाळगडाचा समावेश करण्यासाठी पाठवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने येथील ऐतिहासिक इमारतींची पाहणी करण्यासाठी पन्हाळगडावर आले होते.

महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव विकास खारगे पन्हाळगडावर मान्यवरांच्या सह पहाणी करताना

पन्हाळगड वारसा स्थळांच्या यादीत जाण्यामुळे येथील स्थानिक रहिवाशांचे अथवा शासकीय कार्यालयांचे स्थलांतर केले जाणार नाही.नागरिकांच्या सहभागातूनच नवीन सुधारणा होणार आहेत त्यामुळे स्थानिकांनी कोणताही गैर समाज करून घेऊ नये.अथवा अफवांवर विश्वास ठेऊ नये.

– विकास खारगे, प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य

वारसा स्थळांच्या यादीत समावेशासाठी भारत सरकारने देशातील सर्वच राज्यांकडूनप्रस्ताव मागितले होते.त्यानुसार महाराष्ट्र शासनाने बारा किल्यांचा प्रस्ताव दाखल केला होता. राज्य शासनाचा प्रस्ताव भारत सरकारने स्वीकारून वारसास्थळ समितीकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.राज्य शासनाच्या प्रस्तावात पन्हाळगडाचा समावेश आहे. त्यामुळे पाहणी करण्यासाठी युनेस्कोचा पहाणी दौरा सप्टेंबर महिन्यात गडाला भेट देणार आहे.त्या अनुषंगाने राज्याच्या प्रधान सचिवांनी आज पन्हाळगडाला भेट दिली.यावेळी केलेल्या पाहणी नंतर ते म्हणाले, गडावर आजही भरपूर ऐतिहासिक इमारती अस्तित्वात आहेत.त्या इमारती गडावरील छत्रपतींचे वास्तव्याचा, ऐतिहासिक व पौराणिक ठेवा आहे.त्याचे संवर्धन करून गडाला पूर्वीचे वैभव देण्यासाठी भारतीय पुरातत्वाविभागाने योजना आखली आहे.त्या प्रमाणे ती सर्व कामे केली जाणार आहेत. पण पन्हाळगडावर नागरी वस्ती आहे.म्हणूनच ऐतिहासिक ठेव्या बरोबरच येथील स्थानिक नागरिकही तितकेच महत्वाचे आहेत. त्यामुळे गडावर भविष्यात या संमंधाने राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना, करण्यात येणाऱ्या बदलासाठी स्थानिक लोकांचे मत घेतले जाणार आहे.तसेच या सर्वांमध्ये स्थानिक लोकांना सहभागी करून घेतले जाईल असे सांगितले.

यावेळी पन्हाळा उपविभागीय अधिकारी समीर शिंगटे,तहसीलदार माधवी शिंदे-जाधव, नगरपालिकेचे मुख्याधिकारी चेतन माळी,सार्वजनीक बांधकामाचे अहिरेकर,अमोल कोळी, भारतीय पुरातत्त्वचे अधीक्षक सुभा मुजुमदार, संचालक तेजस गर्गे, पुरातत्त्व सल्लागार योगेश कासार पाटील,अर्चना देशमुख,मंडळ संरक्षण सहायक जंगले आदींसह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व पन्हाळा नागरिक उपस्थित होते.

शिरोळ ते श्रीक्षेत्र पंढरपूर चैत्रवारी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

शिरोळ : शिरोळ ते श्रीक्षेत्र पंढरपूर चैत्र वारी पायी दिंडी सोहळा येत्या १२ एप्रिल ते १७ एप्रिल अखेर आयोजित करण्यात आला असून गुरुप्रसाद इंडस्ट्रीजचे प्रमुख उद्योगपती दादा इंगळे ,अनिल इंगळे, सुनील इंगळे, यांच्यासह शिरोळकर वारकरी सांप्रदाय यांच्या सहकार्याने सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले आहे. हे नववेवर्ष असून या पायी दिंडीमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिरोळ ते श्री क्षेत्र पंढरपूर चैत्रवारी पायी दिंडी शुक्रवार १२ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता हनुमान मंदिर नदीवेश येथून ह भ प राजाराम महाराज यांच्या उपस्थितीत विनापूजना, दिंडीचे प्रस्तान होणार आहे. या पायी दिंडी सोहळ्यामध्ये शिरोळ मधील माऊली महिला भजनी मंडळ, ह भ प महेश कळेकर, ह भ प आप्पासो पाटील बेळंकी, ह भ प गजानन पाटील तानगे शिरोळ ,ह भ प संस्कार महाराज खंडागळे संगेवाडी, ह भ प पुंडलिक कोळी, रंगराव माने गावडे यांच्यासह मान्यवरांचे कीर्तन भजन भारुड चा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे.

या पायी दिंडी मध्ये चालत येणाऱ्या भाविकांना मोफत जेवण ,नाष्टा राहण्याची सेवा दिली जाणार आहे. ज्या भाविकांना सहभागाचे असेल त्यांनी किरण माने ,सर्जेराव माने ,विलास गावडे ,शंकर गावडे, भरत रोडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.

कोल्हापूरच्या छत्रपतींचे विचार विजयी मोट बांधून दिल्ली दरबारात पोहोचवा : छत्रपती संभाजीराजे

गगनबावडा : छत्रपती घराणे शब्दाला जागणारे आहे. लोकांची काळजी घेणारे आहे. ख-या अर्थाने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा समतेचा विचार दिल्लीत पोचवण्यासाठी शाहू महाराजांना भरघोस मतांनी विजयी करा असे आवाहन छत्रपती संभाजीराजे यांनी केले. आमदार सतेज पाटील यांच्यासमवेत गगनबावडा तालुक्यात आयोजित दौऱ्यात ते बोलत होते.

संभाजीराजे पुढे म्हणाले, आपल्या समाजात एकमेकाला आधार देण्याची संस्कृती आहे. पण सध्या भारताचे संविधान धोक्यात आले असून देशात गढूळ झालेले वातावरण सुधारणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी एकदिलाने शाहू महाराजांना पाठबळ द्यावे.

दौऱ्या दरम्यान आमदार सतेज पाटील म्हणाले, सामान्य माणसाला आधार देण्याचे काम आजपर्यंत छत्रपती कुटुंबाने केले आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी खऱ्या अर्थाने रयतेच राज्य आणले. या कर्तृत्वान राजाने सामान्य माणसाला जो न्याय दिला त्याची परतफेड करण्याची संधी आपणाला मिळाली आहे. छत्रपती शाहू महाराजांना उच्चांकी मताने निवडून देऊन त्यांचा सन्मान करुया व गगनबावड्याची ताकद दाखवून देऊया. शेतकरी दिल्लीमध्ये स्वतःच्या हक्कासाठी लढत असताना जर हे सरकार त्यांच्यावर अश्रुधुर सोडत असतील तर शेतकऱ्यांनी या सरकारला त्यांची लायकी दाखवून दिली पाहिजे की अशा सरकारला आम्ही मतदान करणार नाही. हे कोल्हापूर आहे इथे मोदीची गॅरंटी चालत नाही तर सतत शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवणाऱ्या बंटी पाटलांची गॅरंटी चालते.

इलेक्ट्रीसिटी बिल ७.५० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता

राजदंड न्युज नेटवर्क : महागाईचा भडका एवढा आहे की सर्वच कंपन्या त्यांच्या उत्पादनांच्या किंमती वाढवत आहेत. यामुळे सर्वसामान्यांच्या खिशात महिन्याच्या अखेरीस दमडीही शिल्लक राहत नाहीय. अशातच आता महाराष्ट्रात विजेचे दर वाढणार आहेत. एक एप्रिलपासून सुरु होणाऱ्या आर्थिक वर्षासाठी राज्यातीलवीजग्राहकांच्यावीजबिलात जवळपास ७.५० टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षातमहावितरणविजेच्या दरांत १० टक्क्यांची वाढ करणार आहे, अशी माहिती समोर येत आहे. पुणे मिररने याचे वृत्त दिले आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने वीज दरवाढीला मान्यता दिली होती. यानुसार ही दरवाढ करण्यात येणार आहे.महावितरणच्याया दरवाढीचा फटका घरगुती वीज ग्राहकांपासून, शेतकरी, व्यापारी आणि औद्योगिक कंपन्यांनाही बसणार आहे. गेल्या वर्षी देखील दरवाढ केल्याने वीज बिलात सव्वा सात टक्क्यांची सरासरी वाढ झाली होती. आता पुन्हा यंदाच्या आर्थिक वर्षात साडे सात टक्क्यांची सरासरी बिलात वाढ होणार आहे.० ते १०० युनिटपर्यंत वीज दरात कोणतीही वाढ केली जाणार नसून १०१ ते ३०० युनिट वीज वापर असलेल्या ग्राहकांना वीज दर १०.८१ रुपयांवरून ११.४६ रुपये प्रति युनिट आकारला जाणार आहे. तर ५०१ ते १००० युनिट वीज वापर असलेल्या ग्राहकांना १६.७४ रुपयांवरून १७.८१ रुपये वीज दर आकारला जाणार आहे.

नागपूर-मडगाव एक्स्प्रेस जूनअखेरपर्यंत धावणार

अकोला : विदर्भातील प्रवाशांना गोव्याची वारी घडविणाऱ्या नागपूर-मडगाव-नागपूर द्विसाप्ताहिक विशेष एक्स्प्रेसला मुदतवाढ देण्यात आली असून,अकोलामार्गे धावणारी ही गाडी आता ३० जून २०२४ पर्यंत चालविण्यात येणार आहे. या गाडीला अकोल्यात थांबा असल्याने अकोलेकर प्रवाशांची सोय होणार आहे. विदर्भातून कोकणात जाण्यासाठी थेटरेल्वेगाडीनसल्यामुळे अशा गाडीची वारंवार मागणी होत होती.

गर्दीचा हंगाम लक्षात घेऊन या मार्गावर विशेष गाड्यांचे नियोजनरेल्वेकडूनकरण्यात येते. दोन वर्षांपूर्वी दिवाळी व नाताळच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेल्या नागपूर-मडगाव-नागपूर (०११३९/०११४०) या आठवड्यातून दोनदा धावणाऱ्या गाडीला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येत आहे. गाडीला मिळत असलेला वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन रेल्वेने आता ही गाडी २९ जून २०२४ पर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तीन महिन्यांच्या कालावधीत या विशेष गाडीच्या दोन्ही बाजूच्या मिळून ५४ फेऱ्या होणार आहेत.

वेळापत्रक

सुधारित वेळापत्रकानुसार, नागपूर-मडगाव एक्स्प्रेस (०११३९) ही द्विसाप्ताहिक गाडी ३ एप्रिल ते २९ जून पर्यंत नागपूर स्थानकावरून दर बुधवार व शनिवारी दुपारी ३:०६ मिनिटांनी सुटून मडगाव येथे दुसऱ्या दिवशी सायंकाळी ०५:४६ वाजता पोहोचेल. परतीच्या प्रवासात मडगाव-नागपूर एक्स्प्रेस (०११४०) ही द्विसाप्ताहिक गाडी ४ एप्रिल ते ३० जून पर्यंत दर गुरुवार व रविवारी मडगाव स्थानकावरून रात्री ०८:०१ वाजता सुटून दुसऱ्या दिवशी रात्री ०२१:३१ वाजता नागपूर स्थानकावर पोहोचेल.

कोणत्या स्थानकांवर थांबा?

नागपूर जंक्शन ते मडगाव (गोवा) या प्रवासात ही गाडी वर्धा, पुलगाव, धामणगाव बडनेरा, अकोला, मलकापूर, भुसावळ, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, पनवेल, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, राजापूर रोड, कणकवली, कुडाळ, थिवीम (गोवा) तसेच करमाळी (गोवा) या स्थानकांवर थांबणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

हार्दिक पांड्याच्या स्वागतासाठी मुंबई इंडियन्स सज्ज

केश गेमपूर्वी फॅन्ससाठी नियमावली जाहीररोहित शर्माच्या जागी मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदी हार्दिक पांड्याला (क्रीवळज्ञ झरपवूर) बसवणे फॅन्सच्या पचनी पडलेलं नाही.डूऑनलाइन लोकमत।झींलश्रळीहशव:-ळिश्र १, २०२४ ०६:०० झचशेअर :षरलशलेज्ञींळींशीहरींरींशिश्रशसीरा गेळप ी हार्दिक पांड्याच्या स्वागतासाठी मुंबई इंडियन्स सज्ज; केश गेमपूर्वी फॅन्ससाठी नियमावली जाहीरखझङ २०२४ चींलरळ खपवळरपी ी ठरक्षरींहरप ठेरश्री डळींश णविरींश चरीरींहळ : रोहित शर्माच्या जागीमुंबई इंडियन्सच्याकर्णधारपदीहार्दिक पांड्याला(क्रीवळज्ञ झरपवूर) बसवणे फॅन्सच्या पचनी पडलेलं नाही.हार्दिक पांड्यालाअहमदाबादमधील त्याच्या घरच्या प्रेक्षकांच्याही रोषाचा सामना करावा लागला. हैदराबादमध्येही हार्दिकला हाच अनुभव आला आणि आज चख त्यांचा घरच्या मैदानावरील पहिला सामना खेळणार आहे. पण, वानखेडे स्टेडियमच्या बाहेर रोहितच्या नावाचाच गजर पाहायला मिळतोय... रोहितच्या नावाचे टी शर्ट घालून हजारो चाहते मैदानाच्या दिशेने जात आहेत. अशा वेळी हार्दिकला घरच्या मैदानावरही चाहत्यांचा रोष पत्करावा लागेल, असे चिन्हे आहेत. त्याच पार्श्वभूमीवर चींलरळ खपवळरपी ने नियमावली जाहीर केली आहे.

वानखेडे स्टेडियमवर चख च्या पहिल्या घरच्या सामन्यातून हार्दिकचे त्याच्या 'जुन्या' घरी स्वागत होणार आहे. फ्रँचायझी त्यासाठी सज्ज होत आहे. आज चख ी ठठ सामन्यापूर्वी फ्रँचायझीने चाहत्यांना वानखेडेवर कोणत्याच त्रासाचा सामना करायचा नसेल तर नियमांचे पालक करण्याचे आवाहन केले आहे. फ्रँचायझीने चाहत्यांसाठी काही 'टिप्स' जारी केल्या आहेत. नियमांमध्ये भुवया उंचावणाऱ्या काही सूचनांचा समावेश आहे. हार्दिक पांड्याला त्रास होणार नाही याची खात्री करण्यासाठी फ्रँचायझीने तीन नियम आणले आहेत. आक्षेपार्ह चिन्हआक्षेपार्ह/धमकीदायक आचरणभेदभाव करणारी भाषा किंवा हावभावहे नियम भारतातील प्रत्येक स्टेडियमवर लागू केले जातात, परंतु फ्रँचायझीने यात हे नवीन नियम आणले आहेत.

आयपीएल २०२४ची १३ सामने झाले आहेत आणि यातमुंबई इंडियन्सहा एकमेव संघ आहे ज्यांना विजय मिळवता आलेला नाही.

पाकिस्तानी खेळाडूंना लष्कराच्या जवानांकडून प्रशिक्षण

रविवारी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने एक मोठी घोषणा करत वन डे आणि ट्वेंटी-२० संघाच्या कर्णधारपदी पुन्हा एकदा बाबर आझमच्या नावाची घोषणा केली. ट्वेंटी-२० विश्वचषकाला अवघ्या दोन महिन्यांचा कालावधी उरला असून यासाठी पाकिस्तानी खेळाडू तयारीला लागले आहेत.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने खेळाडूंच्या फिटनेससाठी विशेष योजना आखली आहे. शेजारील देशातील खेळाडू लष्कराच्या जवानांसोबत प्रशिक्षणाचे धडे घेत आहेत. बाबरसह पाकिस्तानचे २७ खेळाडू काकुल, अबोटाबाद येथील फिटनेस शिबिरात सहभागी झाले.अलीकडेच पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज मोहम्मद आमिर आणि अष्टपैलू इमाद वसिम आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतले आहेत. त्यांनी राजीनामा परत देत पाकिस्तानसाठी उपलब्ध असल्याचे जाहीर केले.

इमाद आणि आमिर दोघेही अबोटाबाद येथील फिटनेस शिबिराचा भाग आहेत. बाबर आझमवर सातत्याने टीका करणारी ही जोडी आता बाबरच्याच नेतृत्वात खेळताना दिसणार आहे. आमिर म्हणाला की, पाकिस्तानी लष्कराकडून मिळत असलेले प्रशिक्षण कठीण असले तरी ते फायदेशीर आहे. या प्रशिक्षणामुळे खेळाडूंची क्षमता वाढण्यास मदत होईल. यामुळे नक्कीच ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ साठी संघ अधिक मजबूत होईल.

वेगवान गोलंदाज हारिस रौफने देखील या प्रशिक्षणावरून पीसीबीचे आभार मानले. त्याने सांगितले की, लष्कराच्या जवानांसोबत प्रशिक्षण घ्यायचे हे माझे स्वप्न सत्यात उतरले आहे. मी पुढच्या तीन ते चार आठवड्यात गोलंदाजी करू शकेन आणि मी ट्वेंटी-२० विश्वचषक २०२४ साठी तयार आहे.

पाकिस्तान संघाच्या खेळाडूंनी आर्मी स्कूल ऑफ फिजिकल ट्रेनिंगमध्ये प्रशिक्षण घेतले. यावेळी खेळाडूंचा धावण्याचा सराव घेण्यात आला. २९ खेळाडू या सराव सत्रात सहभागी झाले असल्याची माहिती बोर्डाने दिली. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सांगितले की, पाकिस्तान लष्कराच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. आगामी काळात होणारा ट्वेंटी-२० विश्वचषक, न्यूझीलंडविरूद्धची ट्वेंटी-२० मालिका, आयर्लंड आणि इंग्लंडविरूद्धची ट्वेंटी-२० मालिका यासाठी पाकिस्तानी संघातील खेळाडूंची फिटनेस चाचणी घेण्यात आली.

भारतात पार पडलेल्या वन डे विश्वचषकात शेजाऱ्यांनी निराशाजनक कामगिरी केली. अफगाणिस्तानसारख्या संघाकडून देखील पाकिस्तानला पराभवाचा सामना करावा लागला होता.

IPL मध्ये इतिहास रचणार जसप्रीत बुमराह

आयपीएल २०२४ मध्ये १४ वा सामना हा मुंबई इंडियन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स यांच्यात पार पडणार आहे. मुंबईचे होम ग्राउंड असलेल्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सचा संघ आयपीएल २०२४ मधील पहिला विजय मिळवण्याचा प्रयत्न करेल. या सामन्यात जसप्रीत बुमराहला २ विकेट्स घेण्यात यश आले तर तो आयपीएलच्या इतिहासात एक मोठा रेकॉर्ड आपल्या नावे करू शकतो.

जसप्रीत बुमराह हा मागील अनेक वर्षांपासून आयपीएलमध्ये खेळत आहे. तो जगातील सर्वोत्कृष्ट फास्ट बॉलर्सपैकी एक असून त्याने आयपीएलच्या १२२ सामने खेळून १४८ विकेट्स घेतल्या आहेत. तेव्हा जसप्रीत बुमराह जर राजस्थान विरुद्ध वानखेडेवर होणाऱ्या सामन्यात २ विकेट्स घेऊ शकला तर तो आयपीएलमध्ये १५० विकेट्स घेण्याचा माईलस्टोन गाठेल. यापूर्वी गोलंदाज भुवनेश्वर कुमारने सुद्धा आयपीएलमध्ये १५० विकेट्स पूर्ण केल्या होत्या. परंतु त्याने बुमराहपेक्षा जास्त सामने खेळले होते. तेव्हा जर आज बुमराहने २ विकेट्स घेतल्या तर तो आयपीएलच्या इतिहासात सर्वात जलद १५० विकेट्स पूर्ण करणारा गोलंदाज ठरेल.

आपलं मनोरंजन

आलिया भटने घातलं तब्बल २० कोटींचं नेकलेस

अभिनेत्री आलिया भट हिच्या स्टाईलची, तिच्या कपड्यांची, दागदागिन्यांची नेहमीच चर्चा असते. कारण बॉलीवूडमधल्या ज्या काही महागड्या कपडे किंवा क्सेसरीज घालणाऱ्या अभिनेत्री आहेत, त्यापैकी एक म्हणून आलिया भट ओळखली जाते. आलियाचे महागडे कपडे किंवा दागिने आपण नेहमीच बघत असतो. पण यावेळी मात्र तिने कमालच केली असून तब्बल २० कोटी रुपये किंमत असणारं अतिशय महागडं नेकलेस घालून तिने लंडन येथे झालेल्या केशि ऋश्रर सोहळ्यात उपस्थिती लावली.

सलाम बॉम्बे फाउंडेशनच्या माध्यमातून भारतातील गरजू, विविध सुविधांपासून वंचित असणाऱ्या किशोरवयीन मुलांसाठी फंड उभारण्यासाठी आलियाने या सोहळ्यास उपस्थिती लावली होती.

यावेळी तिने वाईन रंगाचा गाऊन घातला होता आणि त्या गाऊनवर तिने इटलीच्या ईंश्रसरीळ या प्रसिद्ध ब्रॅण्डचे नेकलेस आणि अंगठी घातली होती. तिच्या या दागिन्यांची किंमत जवळपास २० कोटी रुपये एवढी असावी असे हळपवींरिपींळाशी.लेा यांनी दिलेल्या वृत्तात म्हटले आहे.

आलिया भटने जे नेकलेस घातलं आहे, ते हिरे आणि नीलम या अतिमहागड्या रत्नांपासून तयार केलेलं आहे. सगळ्या बाजुंनी हिरे जडविण्यात आलेल्या त्या नेकलेसवर ठिकठिकाणी बारीक आकाराचे नीलम आहेत.

तसेच पेंडंट म्हणूनही मोठ्या आकाराचा नीलम असून त्याभोवती अनेक लहान-लहान हिरे आहेत. पेंडंटप्रमाणेच अंगठीही डिझाईन करण्यात आलेली आहे.

सर्जरी केल्यानं स्वभाव बदलत नाही...' करण जोहरचा बॉलिवूडच्या अभिनेत्रींना टोला

बॉलिवूडचा सर्वात लोकप्रिय दिग्दर्शक म्हणजे करण जोहर. तो इंडस्ट्रीतील सर्वात फॅशनेबल फिल्ममेकर मानला जातो. करणने चित्रपटसृष्टीत नुकतीच २५ वर्ष पूर्ण केली आहेत. २५ वर्ष झाले करण जोहर बॉलिवूडमध्ये एक सो एक सिनेमे दिले आहेत. त्याचबरोबर करण जोहरने अनेक मित्र बनवले आहेत त्याचबरोबर त्याचे शत्रू देखील निर्माण झाले आहेत. आता करणने आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर एक क्रिप्टीक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमधून त्यानं बाह्य सौंदर्यामुळे एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्यांवर निशाणा साधला आहे.

करण जोहर हा इंडस्ट्रीतील सर्वात फॅशनेबल फिल्ममेकर मानला जातो. त्याची स्वतः ची खास शैली आहे. आता करणने एक पोस्ट शेअर करत सर्जरी करून सौंदर्य प्राप्त करणाऱ्या अभिनेत्रींवर थेट निशाणा साधला आहे. त्यानं या पोस्टमध्ये मेकअप केल्याने वय कमी होत नाही किंवा बोटॉक्सने तुम्हाला अधिक सुंदर बनवता येत नाही' असं देखील म्हटलं आहे.

करण जोहरने या पोस्टमध्ये लिहिलंय की, 'कितीही मेकअप केला तरी, वय कमी होत नाही कितीही बोटॉक्स करा, तुम्हाला मधमाशी चावल्यासारखं दिसेल नाक बदलल्यानं वास सुगंधात परावर्तित होत नाही, शस्त्रक्रिया केल्याने चेहरा बदलेल पण स्वभाव कधीच बदलू शकत नाही. असं म्हणत करण जोहरने सर्जरी करून सुंदर दिसणाऱ्या सगळ्यांवर नाराजी व्यक्त केली आहे. करण जोहरची ही पोस्ट सध्या चर्चेचा विषय ठरतेय. करण जोहरने या पोस्टमध्ये नक्की कोणावर निशाणा साधलाय याची चर्चा होतेय.

करण जोहरच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर, त्यानं निर्मिती केलेला क्शन थ्रिलर चित्रपट 'योधा' नुकताच प्रदर्शित झाला होता. पण हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर फार काही कमाल दाखवू शकला नाही. करणला या चित्रपटाकडून खूप अपेक्षा होत्या. या चित्रपटात सिद्धार्थ मल्होत्रा आणि राशि खन्ना मुख्य भूमिकेत होते. याशिवाय करण 'स्टुडंट ऑफ द इयर'च्या तिसऱ्या भागावर काम करत आहे. हा एक सिनेमा नसून वेब सिरीज होणार आहे, जी जढढ वर रिलीज होणार आहे. करण नाही तर रीमा माया याचे दिग्दर्शन करणार आहेत.

कसुरी मेथी वापरता, पण 'कसुरी' चा नेमका अर्थ काय?

उन्हाळ्यात स्त्रियांना वाळवण बनवण्याची सवय असते. बरेचसे पदार्थ उन्हाळ्यात वाळवून बनवले जातात. मात्र कसुरी मेथी हिवाळ्यात बनवली जाते. हिवाळ्यात स्वस्तात मिळणारी मेथीची पाने सुकवतात. ही वाळलेली मेथी वर्षभर सहज साठवता येते. ही कसुरी मेथी आहे, असे अनेकांचे मत आहे. तुम्हालाही असे वाटते का? चला जाणून घेऊया यामागचे सत्य.

वाळवून बनवलेली मेथी कसुरी मेथी असते असे तुम्हाला वाटत असेल तर ते चुकीचे आहे. इतकंच नाही तर प्रत्येक घराघरात वापरली जात असूनही 'कसूरी मेथी'ला कसुरी मेथी का म्हणतात हे अनेकांना माहीत नाही. तुमच्या स्वयंपाकघरातील या सुगंधी मसाल्याबद्दल आज आम्ही तुम्हाला माहिती देत आहोत.

सर्वप्रथम मेथी सुकवून कसुरी मेथी बनवली जाते किंवा तिला कसुरी मेथी म्हणतात असे मानणारे सर्व लोक चुकीचे आहेत. कसुरी मेथी हा शब्द पाकिस्तानच्या 'कसौर' या शहरातून आला आहे. वास्तविक, कसौर हे भारतातील शहर होते, पण फाळणीनंतर कसौर पाकिस्तानात गेले.

पंजाब आणि राजस्थानच्या अनेक भागात मेथीचे पीक घेतले जाते. पण फाळणीपूर्वी कसौरमध्ये उगवलेली मेथी ही जगातील सर्वोत्तम मेथी मानली जायची. मेथीची ही जात कसौर जिल्ह्यात घेतली जात असल्याने तिला 'कसुरी मेथी' असे संबोधले जाऊ लागले.

फाळणीनंतर कसौरहून येणारी ही मेथी देशात उपलब्ध नव्हती. अशा परिस्थितीत पंजाबमधील मालेरकोटला आणि राजस्थानच्या नागौरमध्ये मेथीची ही जात पिकवली जाऊ लागली.

वर्षानुवर्षे आपल्या शेतीच्या प्रगत साधनांमुळे आज जगातील सर्वोत्तम आणि सुवासिक कसुरी मेथी आपल्या देशात पिकते. एवढेच नाही तर आज राजस्थान हे देशातील कसुरी मेथीचे सर्वात मोठे उत्पादक बनले आहे. जगात मेथीचे सर्वाधिक उत्पादन भारतात होते.

कसूरी मेथीमध्ये फायबरचे प्रमाण खूप जास्त असते. हे वजन नियंत्रित ठेवण्यासाठी देखील उपयुक्त मानले जाते. कसुरी मेथी शरीराला डिटॉक्स करण्यास देखील मदत करते. याशिवाय आईचे दूध वाढवण्यासाठी कसुरी मेथी खाण्याचा सल्ला दिला जातो.

मंदिराच्या बाहेर जेवणाची पाकिटं वाटताना दिसली सारा अली खान

बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांशिवाय कामासाठी देखील ओळखली जाते. सारा कधीही कोणत्या सेलिब्रिटी सारखी राहत नाही असं अनेकांचं म्हणणं असतं. ती एखाद्या सर्वसामान्य व्यक्ती सारखी राहताना दिसते. अनेकदा आपण तिचे सोशल मीडियावरील फोटो पाहतो त्यात कुठे फिरायला गेल्यानंतर लग्झरीयस हॉटेल न निवडता ती तिथे असलेल्या एखाद्या झोपडीत राहते तिथल्याच लोकांसोबत गप्पा मारते त्यांच्याच इथे जेवते देखील. आता रमजानचा महिना सुरु झाला असून सारा गरजूंची मदत करताना दिसली आहे. मात्र, यावेळी सारा पापाराझींवर संतापल्याचे पाहायला मिळते. त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

सारा अली खानचा हा व्हिडीओ सेलिब्रिटी फोटोग्राफर विरल भयानीनं शूट केला आहे. या व्हिडीओत पाहायला मिळत आहे की सारा ही कॅज्युअल कपड्यांमध्ये आहे. तर ती खाण्याचे काही पॅकेड वाटताना दिसते. या दरम्यान, पापाराझी तिचा व्हिडीओ शूट करत आहेत हे पाहून ती त्यांच्यावर चिडली. तिचा या सगळ्याला नकार होता.

अवघ्या दीड वर्षाची चिमुकली कोट्यावधींची मालकीण

नुकतच रणबीर कपूर हा त्याच्या वांद्र्यातील नवीन घरात दिसला होता. वांद्र्यात सध्या कपूर कुटुंबाचं नवं घर आकार घेतंय. या घराचं काम झाल्यावर संपूर्ण कपूर कुटुंबिय इथेच राहायला येणार असल्याचं म्हटलं जात आहे. या आलिशान बंगल्याची किंमत ही शाहरुखच्या मन्नतला आणि अमिताभ यांच्या जलसा बंगल्याला देखील मागे टाकणारी असल्याचं सांगण्यात येत आहे. राज कपूर यांनी घेतलेलं हे घर कपूरांचा एकुलता एक नातू रणबीरकडे आलं. त्यातच या घराला कपूरांची लाडकी लेक अन् नात राहा हीचं नाव देणार असल्याच्या चर्चा आहेत.

बॉलीवूड लाइफच्या अहवालानुसार, रणबीरने त्याची आणि आलियाची एक वर्षाची मुलगी राहा कपूरच्या नावावर बंगल्याचे नाव ठेवणार असल्याचं समोर आलं आहे. या बंगल्याच्या बांधकामासाठी कथितरित्या २५० कोटी रुपये खर्च झाला आहे. ज्यामुळे हे मुंबईतील सर्वात भव्य सेलिब्रिटींच्या घरांपैकी एक बनले आहे. रणबीर आणि आलिया या दोघांनीही त्यांच्या या घराच्या स्वप्नासाठी आपलं सारखं योगदान दिलं आहे. इतर बॉलीवूड मेगास्टार्सच्या तुलनेत हा बंगला मुंबईतील सर्वात महागडा ठरेल अशी जोरदार चर्चा सुरु आहे.

आलिशान बंगल्याला देणार लेकीचं नाव

दरम्यान रणबीरने या बंगल्याला त्याच्या लेकीचं नाव देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मुंबईतल्या सगळ्यात महागड्या घराला नाव असणारी राहा ही पहिलीच स्टारकिड आहे. याचसगळ्यामध्ये राहा ही सर्वात श्रीमंत स्टारकिड असल्याचं म्हटलं जातंय. या बंगल्याव्यतिरिक्त रणबीर आणि आलियाचे वांद्रे येथे चार फ्लॅट आहेत, ज्यांची एकत्रित किंमत ६० कोटींहून अधिक आहे. रणबीरची आई नीतू कपूर या बंगल्याची सह-मालक असणार आहेत. कारण ऋषी कपूर यांच्या इच्छेनुसार नीतू कपूर या संपूर्ण मालमत्तेच्या अर्धा मालकीण आहेत. त्यांनी अलीकडेच वांद्रे येथे १५ कोटींचे घर खरेदी केले आहे.

रणबीर आणि आलियाची मालमत्ता

या आलिशान बंगल्याशिवायच वांद्र परिसरातच रणबीर आणि आलियाचे ४ फ्लॅट्स आहेत. या फ्लॅट्सची किंमत जवळपास ६० कोटींपेक्षा जास्त आहे. दरम्यान या बंगल्याच नीतू कपूर या देखील रणबीरसोबत मालकीण असणार आहेत. कारण दिवंगत अभिनेते ऋषी कपूर यांनी त्यांच्या सर्व मालमत्तेची अर्धी जबाबदारी नीतू यांच्याकडे सोपवली होती. नीतू कपूर यांनी नुकतच वांद्रे परिसरात १५ कोटींचे घर खेरदी केल्याची माहिती सध्या समोर आली होती.

कच्चातिवू बेटावर पुन्हा कब्जा करून भारताच्या मच्छिमारांची समस्या दूर होणार?

राजदंड न्युज नेटवर्क : भारत आणि श्रीलंका यांच्यामध्ये असलेल्या कच्चातिवू बेटावरून दक्षिणेत राजकारण तापलं आहे. या मुद्द्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसला लक्ष्य करत तत्कालीन सरकारच्या या निर्णयावर भारतीयांमध्ये नाराजी असून काँग्रेसवर विश्वास ठेवता येणार नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट झाल्याचं म्हटलं आहे.

तामिळनाडूचे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष के. अन्नामलाई यांनी आरटीआय दाखल केला होता. त्याला उत्तर देताना असं समोर आलं आहे की १९७४ मध्ये तत्कालीन इंदिरा गांधी सरकार आणि श्रीलंकेचे राष्ट्रपती श्रीमावो बंदरनायके यांच्यात एक करार झाला होता. या कराराअंतर्गत भारताने श्रीलंकेला कच्चातिवू बेट सुपूर्द केले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी याबाबत सोशल मीडियावर पोस्ट केले आणि राजकारणात पुन्हा नवा वाद उफाळून आला. तर या करारामुळे श्रीलंकेतून ६ लाख तामिळींना पुन्हा भारतात आणले गेले असा दावा काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी केला आहे.

कच्चातिवू बेट तामिळनाडूच्या रामेश्वरमपासून २५ किमी उत्तर पश्चिमेकडील एक बेट आहे. १९७४ मध्ये करारानुसार हे बेट श्रीलंकेकडे गेले. या करारानंतर दोन्ही देशांची समुद्री सीमा निश्चित करण्यात आली होती. सध्या भारत आणि श्रीलंका यांच्यात कुठलाही सीमावाद नाही. परंतु तरीही हे बेट दोन्ही देशांमधील वादाचा मुद्दा आहे.

कच्चातिवू बेट बंगालच्या खाडीला अरबी समुद्राशी जोडते.

जवळपास २८५ एकर ही जमीन आहे. जर या भागाची तुलना करायची झाली तर दिल्लीच्या जेएनयू कॅम्पसच्या ३ पटीने जास्त जागा आहे. तर लाल किल्ला याहून काहीसा छोटा असेल. सॅटेलाईट कॅमेऱ्याने पाहिले तर हे बेट निर्जनस्थळ आहे. त्याठिकाणी हेलिपॅडसारखं काहीतरी बनवलं आहे. त्यासोबत बेटावर एका कोपऱ्यापासून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत जोडणारे रस्ते दिसतात. काही इमारती आहेत ज्याचा उपयोग श्रीलंकन नौदल करते.

स्थानिक माध्यमांनुसार, श्रीलंकेने सुरक्षेच्या दृष्टीने कच्चातिवू बेटावर एक नौदलाची तुकडी तैनात केली आहे. ही तुकडी न केवळ समुद्री किनाऱ्याचे रक्षण करते तर येथील सेंट एंटनी चर्चही सुरक्षा नौदलाकडे आहे. याठिकाणी येणाऱ्या लोकांनी पोस्ट केलेल्या फोटोंमुळे श्रीलंकन नौदलाची जहाजे दिसतात.

श्रीलंकेच्या संरक्षण मंत्रालयानुसार, जवळपास ४५०० लोकसंख्या असलेल्या डेल्फ्ट बेटावर २००२ मध्ये नौदल स्टेशन बनवण्यात आलं होते. तिथून कच्चातिवू आणि त्याच्या आसपासच्या बेटांवर श्रीलंकेचे लष्कर पेट्रोलिंग करताना आढळते. कच्चातिवू बेट आंतरराष्ट्रीय समुद्री सीमा रेषेजवळ आहे. याठिकाणी भारतीय मच्छिमारांना मासे सुकवणे आणि सेंट एंटनी चर्चमध्ये होणाऱ्या वार्षिक धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची परवानगी आहे. परंतु मासे पकडण्यास सक्त मनाई आहे.

१९७४ मध्ये भारत आणि श्रीलंका यांच्यात करार झाला होता. या करारानुसार, दोन्ही देशांमध्ये समुद्री सीमा निश्चित करण्यात आली. परंतु यावरून अद्यापही गोंधळ आहे. कराराच्या अनुच्छेद ५ मध्ये म्हटलंय की, भारतीय मच्छिमार आणि तिर्थक्षेत्री येणारे पर्यटक विना कुठल्याही परवान्याने कच्चातिवू बेटावर ये-जा करू शकतात. तर अनुच्छेद ६ नुसार, दोन्ही देशांचे जहाज एकमेकांच्या समुद्री सीमेत येऊ जाऊ शकतात

१९७६ साली दोन्ही देशात पुन्हा एक करार करण्यात आला. त्यानुसार आंतरराष्ट्रीय सीमा मन्नारची खाडी आणि बंगालच्या खाडीपर्यंत वाढवण्यात आली. गेल्या अनेक वर्षापासून भारतीय मच्छिमार हे कच्चातिवू बेट आणि त्याच्या आसपास मासेमारी करतात

सध्या भारत आणि श्रीलंका यांच्या वादाचा मुद्दा म्हणजे मासेमारी, भारतीय समुदाच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात मासे नाहीत. त्यामुळे बेटाच्या आसपास मासेमारी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडावी लागते. जी ओलांडल्यानंतर श्रीलंका नौदल मच्छिमारांना ताब्यात घेते. त्यामुळे हा एक वाद बनला आहे.

मी तुमच्या घराचे नाव बदलले, तर ते माझे होईल का?' एस जयशंकर यांनी चीनला सुनावले

राजदंड न्युज नेटवर्क : अरुणाचल प्रदेशावर दावा सांगणाऱ्या चीनला जयशंकर यांनी कडक शब्दात सुनावले. 'मी तुमच्या घराचे नाव बदलले, तर ते माझे होईल का?' एस जयशंकर यांनी चीनला सुनावले.

भारताचा शेजारील देशची नसत ईशान्येकडील अरुणालच प्रदेशावर आपला दावा सांगतो. यावरुन अनेकदाभारतआणिचीन च्यासैनिकांमध्ये हिंसक चकमकी झाल्या आहेत. दरम्यान, आता केंद्रीय परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी चीनला कडक शब्दात सुनावले. सोमवारी (१ एप्रिल) जयशंकर म्हणतात, मी तुमच्या घराचे नाव बदलले, तर ते माझे होईल का? अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य घटक आहे. नाव बदलून काहीही होणार नाही. भारताचे सैन्य एलएसीवर तैनात आहे. ते त्यांचे काम योग्यरित्या करतील.

दरम्यान, सोमवारीच चीनने भारतातील विविध ठिकाणांच्या ३० नवीन नावांची चौथी यादी जाहीर केली आहे. यानंतर जयशंकर यांची ही प्रतिक्रिया समोर आली. कार्यक्रमादरम्यान पत्रकारांनी परराष्ट्रमंत्र्यांना याबाबत प्रश्न विचारला होता, त्यावर त्यांनी चीनला आरसा दाखवला. अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांची नावे बदलण्याच्या चीनच्या प्रयत्नांचे भारताने खंडन केले.

चीनने अरुणाचल प्रदेशला 'जंगनान' म्हटले

चीनी सरकारी मीडिया 'ग्लोबल टाईम्स' नुसार, चीनच्या नागरी व्यवहार मंत्रालयाने 'जंगनान'मधील भौगोलिक नावांची चौथी यादी जाहीर केली. चीन अरुणाचल प्रदेशला 'जंगनान' म्हणतो आणि राज्यावर दक्षिण तिबेटचा भाग असल्याचा दावा करतो. मंत्रालयाच्या अधिकृत वेबसाइटवर प्रदेशासाठी ३० नावे देखील पोस्ट करण्यात आली आहेत. ही यादी १ मे पासून लागू होणार आहे. तिथल्या मंत्रालयाने यापूर्वी २०१७ मध्ये जंगनान मधील सहा ठिकाणांच्या नावाची पहिली यादी जाहीर केली, तर २०२१ मध्ये १५ ठिकाणांची दुसरी यादी जाहीर केली होती. त्यानंतर २०२३ मध्येही ११ ठिकाणांच्या नावांसह तिसरी यादी जाहीर करण्यात आली होती.अरुणाचल प्रदेशवर अमेरिकेची प्रतिक्रिया

अरुणाचल प्रदेश भारताचा भाग असल्याचे म्हणत अमेरिकेने यापूर्वीच चीनवर टीका केली होती. तसेच, एलएसीवर सीमा वाढविण्याच्या दिशेने उचललेल्या चीनच्या पावलांचा निषेधही केला होत.

अरविंद केजरीवालांच्या अडचणी संपेनात!

नवी दिल्ली : दिल्लीतल्या मद्य धोरण घोटाळ्यात आरोप असलेले मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी संपत नसल्याचे चित्र आहे. अरविंद केजरीवाल यांना २१ मार्च रोजी रात्री सहा दिवसांची ईडी कोठडी देण्यात आली होती. ही मुदत संपल्यानंतर ईडीने आणखी सात दिवसांची कोठडी मागितली. त्यानंतर आज कोठडीची मुदत संपल्याने केजरीवाल यांना राऊस ॲव्हेन्यू कोर्टात हजर करण्यात आले. मात्र, त्यांना कोणताही दिलासा न मिळाता त्यांची कोठडी १५ एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली आहे. राऊस एव्हेन्यू न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी हे निर्देश दिले.

अरविंद केजरीवाल यांना मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. अंम लबजावणी संचालनालयाने (ईडी) केजरीवाल यांच्या 'असहकार' वर्तनाचा दाखला देत पंधरा दिवसांची न्यायालयीन कोठडी मागितली होती, त्यानुसार कोठडी वाढवण्याचे आदेश देण्यात आले.

केजरीवाल यांना अटक का झाली?

दिल्ली सरकारच्या उत्पादन शुल्क धोरण २०२१-२२ मधील घोटाळ्यात ईडी मनी लॉंड्रिंगचा तपास करत आहे. याला दारू घोटाळा असेही म्हणतात. जुलै २०२२ मध्ये दिल्लीच्या तत्कालीन मुख्य सचिवांनी एलजी व्हीके सक्सेना यांना अहवाल सादर केला होता. यामध्ये अबकारी धोरणात अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणी आधी सीबीआयने आणि नंतर ईडीने गुन्हा दाखल केला.

दिल्लीचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना गेल्या वर्षी २६ फेब्रुवारीला या कथित दारू घोटाळ्यात अटक करण्यात आली होती. त्यानंतर ४ ऑक्टोबर रोजी आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांना देखील अटक करण्यात आली होती. तर गेल्या वर्षी २ नोव्हेंबरला ईडीने केजरीवालांना पहिला समन्स पाठवला होता. तेव्हापासून आत्तापर्यंत ईडीने केजरीवालांना १० समन्स पाठवले आहेत. इतके समन्स पाठवूनही ते ईडीसमोर हजर झाले नव्हते. त्यामुळे दिल्ली उच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना अटकेपासून संरक्षण देणारी याचिका फेटाळली. त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची चौकशी

पीएम मोदींच्या हस्ते ९० रुपयांचे नाणे लॉन्च, पाहा कसे असणार

नवी दिल्ली : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेला ९० वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्तानं मुंबईत कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. ठ्ठखच्या स्थापनादिवसाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित होते. सकाळीच मुंबईत पंतप्रधान मोदींचं आगमन झालं. रिझर्व्ह बँकेला ९० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पंतप्रधान मोदींनी ९० रुपयांचे विशेष नाणे जारी केलं. देशात प्रथमच ९० रुपयांचे नाणे जारी करण्यात आले आहे. या नाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे ते शुद्ध चांदीचे आहे. याशिवाय यामध्ये ४० ग्रॅम चांदीचा वापर करण्यात आला आहे. ९० रुपयांच्या चांदीच्या नाण्यावर एका बाजूला आरबीआयचा लोगो आहे आणि दुसऱ्या बाजूला ९० रुपये असं लिहिलेलं आहे.

९० रुपयांच्या नाण्याचं वैशिष्ट्य

९० रुपयांच्या नाण्याच्या उजव्या बाजूला हिंदीमध्ये आणि डाव्या बाजूला इंग्रजीमध्ये भारत लिहिलेलं आहे. नाण्याच्या एका बाजूला आरबीआयचा लोगो असेल आणि वरच्या बाजूला हिंदीमध्ये आणि खाली इंग्रजीमध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया लिहिलेले आहे. लोगोच्या खाली ठ्ठख ॅ९० असे लिहिलेलं आहे. भारत सरकारच्या टांकसाळीत बनवलेल्या या ९० रुपयांच्या नाण्याचे वजन ४० ग्रॅम आहे. विशेष म्हमजे हे नाणं ९९.९ टक्के शुद्ध चांदीपासून बनलेलं आहे. याआधीही १९८५ मध्ये रिझर्व्ह बँकेच्या सुवर्ण जयंती आणि २०१० मध्ये रिझर्व्ह बँकेच्या प्लॅटिनम ज्युबिलीवर स्मारक नाणी जारी करण्यात आली होती.

किती रुपयांना मिळणार नाणं?

मिळालेल्या माहितीनुसार या नाण्याची अंदाजे किंमत ५२०० ते ५५०० रुपये असण्याची शक्यता आहे. देशभरातील बँक कर्मचाऱ्यांसह नाणे संग्राहकांमध्ये या नाण्याबाबत प्रचंड उत्साह आहे. १९ मार्च २०२४ रोजी, आर्थिक व्यवहार विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांनी हे नाणे जारी करण्यासाठी राजपत्र अधिसूचना देखील जारी केली होती.

पीएम मोदींकडून कौतुक

आरबीआयच्या ९० वर्षाच्या योगदानाबद्दल बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौकुत केलं आहे. देशाची बँकिंग व्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी आरबीआयची भूमिका महत्त्वाची आणि मोठी आहे. आरबीआच्या कामाचा थेट परिणाम देशातील सामान्य लोकांच्या अर्थव्यवस्थेवर होतो. शेवटच्या टप्प्यावर उभ्या असलेल्या लोकांपर्यंत आर्थिक समावेशनाचे फायदे पोहोचवण्यात आरबीआयने म हत्त्वाची भूमिका बजावली आहे अशा शब्दात पीएम मोदींनी कौतुक केलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना पी एम मोदी यांनी मी हे १०० दिवस निवडणुकीमध्ये व्यस्त आहे, त्यामुळे तुमच्याकडे नवीन धोरणांचा विचार करण्यासाठी भरपूर वेळ आहे, कारण शपथ घेतल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून तुम्हाला खूप काम करावे लागेल

भारतात एप्रिल-मे महिन्यात उष्णतेची लाट येणार
हवामान विभागाचा इशारा

राजदंड न्युज नेटवर्क : भारतात एप्रिल ते जून महिन्याच्या दरम्यान तापमानात आणखी वाढ होणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे. भारतातील विविध भागात एप्रिल आणि मे महिन्यात कडक उन्हाचा तडाखा सहन करावा लागणार आहे. यंदा उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक फटका मध्य भारताला बसण्याची शक्यता आहे. तसेच पुढील पाच दिवसांमध्ये राज्यातही उष्णतेची लाट येणार असल्याचा इशारा 'आयएमडी'कडून देण्यात आला आहे.

कोणत्या भागात सर्वाधिक उष्णता वाढणार?

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, एप्रिल ते जून या दरम्यान गुजरात, आंध्रप्रदेश, ओडिशा, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, हिमालचल प्रदेश, महाराष्ट्र, बंगाल या राज्यासह आदी भागांमध्ये सर्वाधिक उष्णता असणार आहे. याबरोबरच समुद्रकिनारी असलेल्या भागालादेखील उष्णतेचा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मे महिन्यात चार अंशानी तापमान वाढणार?

मार्च महिन्यात ४० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मार्च महिन्यात एक किंवा दोन अंश सेल्सिअस तापमान कमी जास्त झाल्याची नोंद झाली. मात्र, एप्रिलमध्ये या तापमानामध्ये दोन किंवा तीन अंशाने वाढ होणार आहे. तसेच हे तापमान वाढून एप्रिल महिन्यात ४२ अंश आणि मे महिन्यात तापमानामध्ये आणखी वाढ होऊन ४४ अंशापर्यंत जाऊ शकते, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली आहे.

उष्णतेची लाट दहा दिवस राहणार?

एक ते तीन दिवसांच्या तुलनेत या वर्षी उष्णतेची लाट आठ दिवस राहणार असल्याचे भारतीय हवामान विभागाने सांगितले आहे. दरम्यान, भारतात एप्रिल-मे महिन्यात सूर्य आणखी तापणार असल्यामुळे नागरिकांना काळजी घ्यावी लागणार आहे.

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान व पत्नी बुशरा बीबी यांना दिलासा; १४ वर्षांच्या शिक्षेला स्थगिती

राजदंड न्युज नेटवर्क : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. इस्लामाबाद हाईकोर्टाने तोशाखाना भ्रष्टाचार प्रकरणात इम्रान खान व त्यांची पत्नी बुशरा बीबी यांना ठोठावण्यात आलेली १४ वर्षांची शिक्षा स्थगित केली आहे. देशातील सार्वत्रिक निवडणुकीच्या काही दिवस आधी तोशाखानाकडून मिळालेल्या सरकारी भेटवस्तूमध्ये भ्रष्टाचार केल्याचा आरोप करण्यात आला होता. याप्रकरणी न्यायालयाने ३१ जानेवारी २०२४ रोजी दोघांना १४-१४ वर्षांची शिक्षा ठोठावली होती. दोघांनी या शिक्षेविरोधात इस्लामाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. येथे मुख्य न्यायमूर्ती जस्टिस आमिर फारूक यांच्या नेतृत्वात २ सदस्यीय खंडपीठाने प्रकरणाची सुनावणी केली.

इस्लामाबाद उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, रमजान ईदच्या सुट्टीनंतर मुख्य याचिकेवर निर्णय घेतला जाईल. तोपर्यंत या जोडप्याची शिक्षा स्थगित राहील. याबाबत पक्षाकडून निवेदन प्रसिद्ध करण्यात आलं आहे.

सोमवारी इस्लामाबाद हायकोर्टाने दाम्पत्याला दिलासा दिला. मात्र न्यायालयाने सांगितले की, दोषमुक्तीच्या याचिकेवर ईदच्या सुट्ट्या संपल्यानंतर सुनावणी घेतली जाईल. मात्र इम्रान खान यांची सुटका होऊ शकत नाही, कारण अन्य प्रकरणात त्यांना दोषी ठरवले आहे. आरोपातून मुक्त होईपर्यंत त्यांची सुटका केली जाऊ शकत नाही.

तोशाखाना भ्रष्टाचार प्रकरणात ७१ वर्षीय इम्रान खान यांच्यावर पाकिस्तानचे पंतप्रधान कार्यकाळात मिळालेल्या सरकारी भेटवस्तू आपल्याकडे ठेवल्याचा आरोप आहे. तोशाखाना संबंधित नियमानुसार सरकारी अधिकारी किंमत देऊन भेटवस्तू घेऊ शकतात. मात्र आधी भेटवस्तू तोशाखानामध्ये जमा केल्या पाहिजेत. इम्रान खान आणि त्यांची पत्नीने या भेटवस्तू जमा केल्या नाहीत व आपल्या अधिकाराचा गैर फायदा घेत कमी किंमतीत मिळवल्या. ३० जानेवारी रोजी सिफर प्रकरणात १० वर्षाची शिक्षा सुनावल्यानंतर दुसऱ्यात दिवशी इम्रान खान तोशाखाना प्रकरणात दोषी ठरले होते.

जागावाटपावरून मतभेद, तरीही व्यासपीठावर एकत्र; 'इंडिया' आघाडीकडून एकजूट दाखवण्याचा प्रयत्न?

दिल्ली : रविवारी दिल्लीतील रामलीला मैदानावर 'इंडिया' आघाडीची जाहीर सभा पार पडली. यावेळी इंडिया आघाडीतील सर्वच पक्ष एकाच व्यासपीठावर आल्याचं बघायला मिळालं. तसेच इंडिया आघाडीतील नेत्यांकडून केंद्रातील भाजपा सरकारवर जोरदार टीकाही करण्यात आली. पंतप्रधान मोदी हे निवडणूक फिक्स करत आहेत, असा आरोप इंडिया आघाडीकडून करण्यात आला. महत्त्वाचे म्हणजे जागावाटपावरून मतभेद सुरू असताना हे पक्ष एकाच व्यासपीठावर आल्याने विविध राजकीय चर्चांनाही उधाण आले. निवडणुकीपूर्वी एकाच व्यासपीठावर येऊन आम्ही भाजपाच्या विरोधात ठामपणे उभे आहोत, असा संदेश देण्याचा प्रयत्न इंडिया आघाडीकडून करण्यात आला.

यावेळी बोलताना काँग्रेस नेत्यांनी मोदी सरकारवर सडकून टीका केली. मोदी सरकार निवडणूक फिक्स करण्याचा प्रयत्न करत आहे. ईडी, सीबीआय आणि प्राप्तिकर विभाग हे मोदींच्या टीममधील खेळाडू आहेत, असा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला; तर तेजस्वी यादव यांनी बिहारमध्ये सत्तेत असताना केलेल्या कामांचा पाढा वाचला. आमच्या सरकारने १७ महिन्यांत पाच लाख तरुणांना रोजगार दिला असल्याचे ते म्हणाले.

याशिवाय तृणमूल काँग्रेसचे नेतेही व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांनीही मोदी सरकारला लक्ष्य केले. केंद्रातील मोदी सरकारमुळे संविधान धोक्यात आले आहे, अशी टीका तृणमूल काँग्रेसच्या खासदार सागरिका घोष यांनी केली. तसेच पश्चिम बंगालला मिळणारा निधी मोदी सरकारने जाणीवपूर्वक रोखून धरला, असा आरोपही त्यांनी केला.

झारखंडचे मुख्यमंत्री चंपई सोरेन यांनीदेखील यावेळी मोदी सरकारवर टीका केली. माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना खोट्या आरोपाखाली अटक करण्यात आली असून ते मोदी सरकारपुढे कधीही झुकणार नाहीत, असे ते म्हणाले. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनीही अरविंद केजरीवाल यांच्या अटकेवरून मोदी सरकारवर निशाणा साधला. विशेष म्हणजे या सभेला अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवालदेखील उपस्थित होत्या. त्यांनी मोदी सरकारवर टीका केली, तसेच अरविंद केजरीवाल निर्दोष असल्याचे त्या म्हणाल्या.

पंजाब वगळता विविध राज्यांत काँग्रेस आणि आप यांच्यात युती आहे. यावरून काँग्रेसने आपला संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. ''आपण एकत्र झालो तरच काही तरी साध्य करू शकतो. एकमेकांना मागे खेचण्याचा प्रयत्न केला तर आपण कधीच पुढे जाऊ शकणार नाही, त्यामुळे सर्वात आधी आपण एकत्र येणे आवश्यक आहे'', अशी प्रतिक्रिया यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिली. दरम्यान, खरगे यांच्या आवाहनानंतर पंजाबमध्ये काँग्रेस आणि आप यांच्यात युती होणार का? याकडे सर्वांचे लक्ष आहे. पंजाबमध्ये शेवटच्या टप्प्यात म्हणजे १ जून रोजी मतदान होणार आहे.

पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील जागावाटपाची चर्चा अपयशी ठरली. राज्यात दोन्ही पक्ष एकमेकांविरोधात उभे आहेत. त्यामुळे तृणमूल काँग्रेस इंडिया आघाडीचा भाग आहे की नाही, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता. परंतु, तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी इंडिया आघाडीबाबतची त्यांची भूमिका स्पष्ट केली. तृणमूल काँग्रेस हा इंडिया आघाडीबरोबर होता, आहे आणि पुढेही राहील, असे पक्षाचे खासदार डेरेक ओब्रायन म्हणाले.

संकटात मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांनी पुन्हा चीनपुढे पसरवले हात

राजदंड न्युज नेटवर्क : मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांनी पुन्हा एकदा चीनपुढे गुडघे टेकले आहेत. त्यांनी चीनकडे पाण्याची मागणी केली होती. त्यानंतर चीनने मालदीवमध्ये १५०० टन पिण्याचे पाणी पाठवले आहे. मालदीव सरकारने मंगळवारी सांगितले की, तिबेटमधील हिमनद्यांमधून गोळा केलेले पाणी तीव्र पाणीटंचाई दरम्यान मालेपर्यंत पोहोचले आहे. चीनच्या तिबेट स्वायत्त प्रदेशाचे अध्यक्ष यान जिन्हाई यांच्या मालदीवच्या भेटीदरम्यान मालदीवला पिण्याचे पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये मोहम्मद मुइज्जू आणि यान जिन्हाई यांच्यात भेट झाली होती. त्यादरम्यान हिमनदीतून जमा झालेले पाणी त्यांना द्यावे, असे सांगण्यात आले. हे पाणी स्वच्छ आणि खनिजांनी समृद्ध आहे. मोहम्मद मुइझ्झू यांनी अध्यक्ष झाल्यानंतर पहिली भेट चीनला दिली होती. आजपर्यंत मालदीवचे राष्ट्राध्यक्ष आधी भारताला भेट देत होते.

मागचं सरकार हे भारताच्या बाजुने होते. या दरम्यान दोन्ही देशांमध्ये अनेक करार झाले होते. दोन्ही देशांमध्ये चांगले संबंध होते. पण मुइज्जू हे सरकार मध्ये आल्यापासून आणि ते ते चीन समर्थक असल्याने भारत-मालदीव संबंध बिघडले आहेत. मालदीवला याआधी भारताने पुढे येऊन अनेकदा मदत केली होती. डिसेंबर २०१४ मध्ये जेव्हा पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली तेव्हा भारताने तात्काळ विमानाद्वारे मालदीवमध्ये पाणी पोहोचवले होते.

चीनकडून आतापर्यंत मालदीवला तीन वेळा मदत करण्यात आली आहे. चीन मालदीवला आधुनिक लष्करी उपकरणे आणि लष्करी मदत देखील देत आहे. चीन आणि मालदीवमध्ये दोन लष्करी करार झाले होते. मालदीववर चीनचं मोठं कर्ज आहे. त्यामुळे मालदीवला चीनपुढे झुकावे लागत आहे. चीन कर्ज देऊन छोट्या देशांना आपला गुलाम करत आहे.